सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २६० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १७ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## नितीश कुमारच बिहारचे १० व्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील?

### बिहारमध्ये पुन्हा मुख्यमंत्री पद, फॉर्म्युला ठरला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ पटना**

बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल समोर आला आहे. त्यात सर्वात जास्त जागा जिंकून भाजपा नंबर वनचा पक्ष ठरला आहे. या निवडणुकीच्या निकालात एनडीएला प्रचंड बहुमत मिळाले. त्यात भाजपाला ८९ आणि जेडीयूला ८५ जागा मिळाल्या आहेत. जेडीयूपेक्षा जास्त आमदार आल्याने भाजपा मुख्यमंत्रिपदावर दावा करणार का असा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र बिहारमध्ये सत्तास्थापनेचा फॉर्म्युला ठरला आहे. त्यात नितीश कुमार यांनाच पुन्हा मुख्यमंत्री पद मिळणार असल्याचं पुढे आले आहे.

माहितीनुसार, बिहारच्या नव्या सरकारमध्ये जेडीयूचे १३ मंत्री बनतील आणि मुख्यमंत्रिपद नितीश कुमारांना मिळेल. त्याशिवाय भाजपाच्या वाट्याला १३, लोकजनशक्ती पार्टी ३, हम १ आणि आरएलएम यांना १ मंत्रिपद दिले जाऊ शकते. बिहारमध्ये एकूण ३६ मंत्री बनू शकतात. त्यातील नव्या सरकारमध्ये ५ मंत्रिपदे रिक्त ठेवली जाऊ शकतात आणि आगामी काळात त्या जागांवर विस्तार केला जाऊ शकतो. भाजपाकडून २ उपमुख्यमंत्री असतील. ६ आमदारांवर एक मंत्रिपद असा



फॉर्म्युला सत्तास्थापनेसाठी एनडीएमध्ये ठरल्याचं दिसून येते.

लोजपाचे प्रमुख चिराग पासवान यांनी नितीश कुमारांची भेट घेत तेच पुन्हा मुख्यमंत्री असतील असे संकेत दिले होते. त्यानंतर रविवारी पटना येथे राष्ट्रीय लोक मोर्चाचे प्रमुख उपेंद्र कुशवाह यांनीही नितीश कुमार मुख्यमंत्री होते, आहेत आणि राहतील असं विधान केले. परंतु भाजपाकडून नितीश कुमार यांच्या नावावर उघडपणे भाष्य केले जात नव्हते. हा निर्णय केंद्रीय नेतृत्व घेईल असं विधान भाजपा प्रदेशाध्यक्ष दिलीप जायसवाल यांनी केले होते, आमदारांच्या बैठकीत नेता निश्चित होईल असंही त्यांनी सांगितले. त्यामुळे मुख्यमंत्रिपदावर संभ्रम निर्माण झाला होता.

दरम्यान, केवळ एकाच परिस्थितीत भाजपा पहिल्यांदा बिहारमध्ये मुख्यमंत्री बनवू शकतात, जेव्हा नितीश कुमार स्वत: त्यासाठी मान्य होतील. त्यामुळे नितीश कुमार यांच्या निर्णयावर सर्व अवलंबून आहे. जर बिहारमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री झाला तर नितीश कुमार यांच्या पक्षाकडून १ उपमुख्यमंत्री असतील. नितीश कुमार त्यांचा राजकीय उत्तराधिकारी म्हणून कुठल्या नेत्याला पुढे करतील, ते सरकारमध्ये नंबर २ पोझिशनवर असतील. मात्र याची शक्यता खूप कमी आहे. सध्या नितीश कुमारच बिहारचे १० व्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील अशी दाट शक्यता आहे.

## माजी पंतप्रधान शेख हसीना यांना फाशीची शिक्षा

### मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांत दोषी; न्यायालयाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ढाका**

बांगलादेशात ऑगस्ट २०२४ मध्ये मोठ्या घडामोडी घडल्या होत्या. मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला होता आणि त्यामध्ये शेकडो लोकांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे झालेल्या उठावानंतर शेख हसीना यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा देऊन अखेर देश सोडला होता आणि भारतात आश्रय घेतला होता. दरम्यान, शेख हसीना यांना धक्का देणारी एक मोठी बातमी समोर आली आहे.

माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या विरोधात बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने सोमवारी मोठा निर्णय दिला आहे. मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांत शेख हसीना यांना न्यायालयाने दोषी ठरवलं असून थेट मृत्युदंडाची



(फाशीची शिक्षा) शिक्षा सुनावली आहे. त्यामुळे शेख हसीना यांचे समर्थक आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.शेख हसीना यांना न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावल्यामुळे त्यांचे समर्थक आक्रमक झाले असून बांगलादेशामध्ये तणाव वाढला आहे. त्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत. वृत्तानुसार, शेख हसीना यांच्यावर निशस्त्र आंदोलकांवर गोळीबार करण्याचे आदेश दिल्याचा ठपका ठेवत त्यांना दोषी ठरवण्यात आलं असून फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. इंटरनॅशनल क्राईम ट्रिब्युनलने हा निर्णय दिला आहे.

या प्रकरणात आंतरराष्ट्रीय न्यायाधिकरणाने शेख हसीना यांच्या विरोधात तब्बल ४५८ पानांचा निकाल दिला आहे. त्यामध्ये शेख हसीना यांच्यावर अनेक गंभीर आरोप करण्यात आलेले आहेत. दरम्यान, शेख हसीना यांना शिक्षा सुनावल्याच्या नंतर त्यांच्या समर्थकांनी हिंसा किंवा जाळपोळ करण्याचा प्रयत्न केला तर थेट गोळीबार करण्याचे आदेश जारी करण्यात आले असल्याचंही वृत्तात म्हटलं आहे. या अनुषंगाने ठीक ठिकाणी लष्कराच्या तुकड्या आणि मोठ्या प्रमाणात पोलीस तैनात करण्यात आलेले आहेत.

## सौदी अरेबियातील रस्ते अपघातात ४२ भारतीयांचा मृत्यू

### प्रवासी बस आणि डिझेल टँकरची धडक २० महिला आणि ११ मुलांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मुहरास सौदी अरेबिया**

हैदराबादमधील प्रवाशांना मक्काहून मदीनाला घेऊन जाणाऱ्या बसला सोमवारी सौदी अरेबियात अपघात झाला, ज्यामध्ये ४२ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये २० महिला आणि ११ मुले होती.

स्थानिक माध्यमांनुसार, बस एका डिझेल टँकरला धडकली, ज्यामुळे बसने पेट घेतला. प्राथमिक अहवालात असे म्हटले आहे की सर्व मृत भारतीय होते. बहुतेक प्रवासी हैदराबादचे होते आणि उमरा करण्यासाठी जात होते.

मदिनापासून सुमारे १६० किलोमीटर अंतरावर असलेल्या मुहरासजवळ भारतीय वेळेनुसार पहाटे १:३० वाजता हा अपघात झाला. अपघातावेळी अनेक प्रवासी झोपेत होते, त्यामुळे बसने धडक दिल्यानंतर आग लागल्याने त्यांना वाचण्याची शक्यता नव्हती.

तेलंगणा सरकारने या घटनेवर तात्काळ प्रतिक्रिया दिली आणि सांगितले की ते रियाधमधील भारतीय दूतावासाशी सतत संपर्कात आहेत. राज्य सरकारने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी दिल्लीतील अधिकाऱ्यांना पीडितांची ओळख पटविण्यासाठी आणि इतर औपचारिकता पूर्ण करण्यासाठी दूतावासाशी जवळून समन्वय



साधण्याचे निर्देश दिले आहेत.

**भारतीय दूतावासाने हेल्पलाइन नंबर जारी केला**

जेद्दाह येथील भारतीय दूतावासाने एक हेल्पलाइन जारी केली आहे. सौदी अरेबियातील मदीनाजवळ भारतीय उमराह यात्रेकरूंना झालेल्या दुःखद बस अपघाताच्या पार्श्वभूमीवर, जेद्दाह येथील भारतीय वाणिज्य दूतावासात २४७ नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हेल्पलाइनचे संपर्क क्रमांक ८००२४४०००३ आहेत, असे दूतावासाने म्हटले आहे.

या घटनेनंतर, तेलंगणा सरकारने कुटुंबांना त्यांच्या प्रियजनांबद्दल माहिती मिळावी यासाठी सचिवालयात एक नियंत्रण कक्ष स्थापन केला. कुटुंबातील सदस्य खालील क्रमांकांवर संपर्क साधू शकतात: ७९९७९-५९७५४ आणि ९९१२९-१९५४५.

हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी सौदी अरेबियामध्ये भारतीय उमराह यात्रेकरूंच्या बस अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले आहे. एएनआय वृत्तसंस्थेशी फोनवर बोलताना ओवैसी म्हणाले की त्यांनी हैदराबादमधील दोन ट्रॅव्हल एजन्सींशी संपर्क साधला आहे आणि प्रवाशांची माहिती रियाधमधील भारतीय दूतावासाला दिली आहे.

त्यांनी रियाधमधील भारतीय दूतावासाचे डेप्युटी चीफ ऑफ मिशन (डीसीएम) अबू मथान जॉर्ज यांच्याशीही चर्चा केली. जॉर्ज यांनी त्यांना सांगितले की स्थानिक अधिकाऱ्यांकडून माहिती गोळा केली जात आहे आणि लवकरच अपडेट देण्यात येईल.

## दिल्ली स्फोटाचे अकोला जिल्ह्यात धागेदोरे? जिल्ह्यातील तरुण दिल्लीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अकोला**

दिल्ली स्फोट प्रकरणात जिल्ह्यातील एका तरुणाची पोलिसांकडून चौकशी करण्यात आली. जिल्ह्यातील एक तरुण दिल्लीत त्यावेळी जवळपास असल्याचे उघड झाले. गेल्या काही दिवसांपासून त्याच्या हालचाली देखील संशयास्पद आढळल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन तब्बल १० तास त्याची चौकशी केली. त्यात नेमके काय आढळले, हे गुलदस्त्यात असून पोलिसांकडून माहिती गोपनीय ठेवण्यात येत आहे.



राजधानी दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ मोठा स्फोट झाल्याची घटना १० नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. या स्फोटामुळे अनेकांचा बळी गेला, तर सुमारे ३५ जण जखमी झाले आहेत. या प्रकरणामुळे संपूर्ण देश हादरला. स्फोट प्रकरणाचा सुरक्षा यंत्रणेकडून कसून तपास केला जात आहे. या प्रकरणाशी आता अकोला जिल्ह्याशी काही धागेदोरे जोडले आहेत का? या दृष्टीने तपास सुरू झाला. त्याचे कारणही तसेच असून जिल्ह्यातील एका तरुणाच्या संशयास्पद हालचाली होत्या. घटनेच्या दिवशी तो दिल्लीमध्येच होता. जिल्ह्यातील पिंजर पोलीस ठाण्यांतर्गत एका गावातील तरुणावर पोलिसांचा संशय बळावला होता. घातपाताच्या कारवाईत सहभाग राहण्याच्या शक्यतेवरून त्याच्यावर नजर ठेवण्यात आली होती. दिल्ली येथे १० नोव्हेंबर रोजी झालेल्या स्फोटाच्या काळात हा तरुण जिल्ह्यातून बेपत्ता झाला होता. त्याच दिवशी त्याचे मोबाइल लोकेशन दिल्लीत असल्याचे समोर आले. त्या दिवशीपासून विविध माध्यमांतून पोलिसांकडून तरुणाचा शोध घेण्यात आला

गुप्त माहितीच्या आधारे त्याला ताब्यात घेण्यात आले. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी त्याची चौकशी केल्याची माहिती आहे. स्फोट झाला त्यावेळी हा तरुण दिल्लीत काय करीत होता? याची माहिती पोलिसांकडून घेण्यात आली. तरुणाच्या मोबाइल व त्याचा कॉल रेकॉर्ड तपासला जात असून सध्या प्राथमिक चौकशी केल्याची माहिती आहे.

## आमदारांचं प्रकरण दोन आठवड्यात निकाली काढा, नाहीतर...;

### सर्वोच्च न्यायालय विधानसभा अध्यक्षांवर संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नवी दिल्ली**

तेलंगणातील आमदार अपात्रता प्रकरणावरून सर्वोच्च न्यायालयाने तेलंगणा विधानसभेचे अध्यक्षांना खडेबोल सुनावले. अशा प्रकरणांमध्ये विधानसभा अध्यक्षांना कोणतेही संवैधानिक संरक्षण नाहीये. आम्ही आधीच स्पष्ट केलेले आहे, असे सांगत सर्वोच्च न्यायालयानेआमदार अपात्रता प्रकरण दोन आठवड्यात निकाली काढण्याचे निर्देश दिले.

तेलंगणातील भारत राष्ट्र समितीच्या दहा आमदारांचे अपात्रता प्रकरण विधानसभा अध्यक्षांसमोर प्रलंबित आहे.




आमदारांवर अपात्रतेची कारवाई करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. बीआरएसचे आमदार कौशिक रेड्डी यांनी या प्रकरणी याचिका दाखल केलेली आहे.

सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणी सुनावणी झाली. सरन्यायाधीश गवई म्हणाले, हे प्रकरण पुढील आठवड्यापर्यंत निकाली काढा, नाहीतर न्यायालयाच अवमान केल्याचा सामना करण्यासाठी तयार रहा. हा निर्णय त्यांना द्यायचा आहे. आम्ही आधीच स्पष्ट केले आहे की, अशा प्रकरणामध्ये विधानसभा अध्यक्षांना कोणतेही घटनात्मक संरक्षण नाहीये.नवी वर्ष हे प्रकरण निकाली काढून साजरं करायची की, न्यायालयाचा अवमान केल्याच्या प्रकरणाला सामोरं जायचं आहे. हे विधानसभा अध्यक्षांनी ठरवावं. विधानसभा अध्यक्षांचे हे वर्तन सर्वोच्च न्यायालयाचा घोर अवमानाच्या श्रेणीतच येते, अशा शब्दात सर्वोच न्यायालयाने सुनावले.

भारत राष्ट्र समितीच्या १० आमदारांनी पक्षांतर करत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. निवडून आलेल्या आमदारांवर पक्षांतर बंदी कायद्यानुसार अपात्रता कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. पण, हे प्रकरण गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित आहे. ३१ जुलै रोजी आदेश दिल्यानंतरही आतापर्यंत निकाल क दिला गेला नाही?, असा प्रश्न न्यायालयाने अध्यक्षांना विचारला आहे.

## ‘मित्रपक्ष आहेत, विरोधक नाहीत!’; स्वबळाचा नारा देणाऱ्यांचे मुख्यमंत्री फडणवीसांनी टोचले कान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७संभाजी नगर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जेथे-जेथे शक्य आहे, त्याठिकाणी महायुती करायची आहे. पण, एवढे मात्र लक्षात ठेवायचे की, एखाद्या ठिकाणी आपली महायुती जरी झाली नाही, तरी आपल्यासमोर लढणारे पक्ष आपले मित्र पक्ष असतील, विरोधक नसतील. हे लक्षात ठेवूनच लढायचे आहे. असे स्पष्ट करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वबळाचा नारा देणाऱ्या स्थानिक नेत्यांचे कान टोचले.



चिकलठाणा विमानतळासमोरील भाजपच्या विभागीय कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी रविवारी ते बोलत होते. नगरपालिकेनंतर जिल्हा परिषदेच्या मग महानगरपालिकेच्या निवडणुका आहेत. या सगळ्या निवडणुकांमध्ये विजय मिळवून भाजप नंबर एकचा पक्ष असेल, पालिका निवडणुकीत विरोधकांची माती होणार असल्याचा दावा त्यांनी केला.

फडणवीस म्हणाले, काँग्रेससह विरोधी पक्ष जमिनीवर नसून जनतेत जात नसल्याने त्यांची अशीच माती होत राहील. कधी मतचोरीचा मुद्दा, कधी ईव्हीएमचा मुद्दा आणतात. पण ज्यावेळी कोर्ट त्यांना पुरावा मागते, इलेक्शन कमिशन पुरावा मागते. तेव्हा एक पुरावा देखील देऊ शकत नाहीत, नुसता हवेत गोळीबार करतात. असेच वागत राहिले, तर महाराष्ट्रातल्याही सगळ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत त्यांची माती होईल. हे माझे भाकित आहे.शहर पाणीपुरवठा योजनेत ठाकरे सरकारच्या काळात अडचणी आल्याची टीकाही फडणवीस यांनी केली. मराठवाड्यात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आले. मात्र, गावांमध्ये गेल्यानंतर माणसेच नसायचे. अंबादास दानवे माणसे कुठे गेले हे विचारत होते. लोकांना तुमच्यावर विश्वास नसल्यामुळे ते तुमच्याकडे येणार नाहीत, अशीही टीका त्यांनी केली.

## शिवसेनेने (शिंदे) जाहीर केले सहा नगर पालिकांच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

शिवसेना नेते तथा अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ यांनी आज पत्रकार परिषद घेत २०२५ च्या नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांसाठी सहा नगर पालिकांच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहीर केले. भाजप व राष्ट्रवादी काँग्रेससोबत महायुती करण्याचा प्रयत्न झाला मात्र तो अयशस्वी ठरल्याने शिवसेना स्वबळावर निवडणूक रिंगणात उतरणार असल्याची घोषणा अडसूळ यांनी केली.



घोषित उमेदवारांमध्ये दर्यापूर येथून प्रदीप मलिये, अंजनगाव सुर्जी येथून डॉ. सौ. स्पृहा डकरे, अचलकपूर येथून सौ. रेखाताई जियालाल गड्रेल, मोर्शी येथून रवी गुल्हाने, शेंदुरजनाघाट येथून मीनाताई श्रीराम कोकाटे तर वरूड येथून सुनील तुदडराम यांचा समावेश आहे. उमेदवारांना पक्षाचे -इ फॉर्म स्वतः अडसूळ यांच्या हस्ते देण्यात आले.अमरावती जिल्ह्यातील संपूर्ण स्थितीचा आढावा घेऊन शिवसेनेने पूर्ण ताकदीने लढण्याची तयारी केली असल्याचे अडसूळ यांनी सांगितले. शिवसैनिक एकजुटीने काम केल्यास जिल्ह्यात पुन्हा विविध नगर पालिकांवर भगवा फडकणार, असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला.या पत्रकार परिषदेस माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता, माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील, प्रीती बंड, संतोष बद्रे, श्याम देशमुख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय ......

# कुणी मुलगी देता का मुलगी!

अकोल्याच्या ग्रामीण भागातील एका तरुणाचे पत्र सध्या माध्यमांत प्रचंड चर्चेत आहे. वयाची चाळीशी जवळ येत असून आर्थिक परिस्थिती डळमळीत असल्याने त्याचे लग्न ठरत नाही. शेवटी या तरुणाने समाजात कुणाकडेही अपेक्षा उरली नाही म्हणून थेट राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनाच पत्र लिहिले. 'माझे वय चौतीस वर्षांचे झाले आहे, आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे, म्हणून कुणीही मुलगी देत नाही. मला संसार उभा करण्यासाठी जोडीदार मिळवून द्या,' अशी विनंती त्याने केली आहे. या विनंतीत निरागसपणा आहे. काहींना हे पत्र वाचून हसूही येत असेल, परंतु त्याचबरोबर त्यात समाजातील विषमता, नैराश्य आणि एकटेपणाचे वास्तवही दडलेले आहे. पूर्वीच्या काळी लग्ने अल्पवयात होत असत. शिक्षण, करिअर किंवा स्थैर्य यांसारख्या गोष्टींना तेव्हा फारसे महत्त्व दिले जात नव्हते. घरातील वडीलधारी मंडळी लग्न ठरवत आणि मुलांनीही त्यांच्या सूचनांचे आज्ञापालन करणे हेच कर्तव्य मानले जात होते. आज मात्र चित्र पूर्णत: बदलले आहे. आधुनिकतेच्या आणि शिक्षणाच्या वाऱ्याने समाजाचा विचार बदलला आहे. कुणी मुलगी देता का मुलगी, ही अकोल्यातील तरुणाची हाक महाराष्ट्रातील अनेक तरुणांची प्रातिनिधिक हाक आहे. शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्यांसमोर ही समस्या मांडून या तरुणाने सामाजिक वास्तवाला व्यापक व्यासपीठावरून वाचा फोडली आहे.

आजचा तरुण आणि तरुणी दोघेही स्वतंत्र विचारांचे, आत्मनिर्भरतेवर विश्वास ठेवणारे आहेत. करिअरची धडपड, शिक्षणाची झेप आणि आर्थिक स्थैर्य मिळवण्याची धडपड या सगळ्यात वयाची पंचविशी ते तिशी नकळत निघून जाते. या काळात लग्नाचा विचार मागे पडतो. विशेषत: शहरांमध्ये हा कल अधिक जाणवतो. ग्रामीण भागातही आता हेच चित्र दिसू लागले आहे. मुलींच्या बाबतीत मात्र परिस्थिती थोडी वेगळी आहे. त्या स्वत: आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत, आत्मनिर्भर होत आहेत. परिणामी त्या 'सेटल झालेला' मुलगा शोधतात. त्यामुळे अनेक तरुणांचे लग्न केवळ 'अजून स्थिर झालो नाही' या कारणावरून थांबते. लग्न उशिरा होणे किंवा अजिबात न होणे, याचे गंभीर मानसिक परिणाम व्यक्तीवर होतात.

समाजात अजूनही 'लग्न झाले का' हा प्रश्न सहज विचारला जातो, पण उत्तर देताना एखाद्या एकाकी व्यक्तीच्या मनात किती गोंधळ असतो, हे कोणी पाहत नाही. अशा व्यक्तींना एकटेपणा, न्यूनगंड, आत्मविश्वासात घट आणि कधी कधी नैराश्य यांचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागात तर लग्न न होणे ही सामाजिक लाज मानली जाते. काही ठिकाणी तर लग्न न होणे ही बाब थेट त्या व्यक्तीच्या पुरुषत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. आजच्या पिढीच्या विचारांमध्ये बदल झाल्याचे मान्य करावेच लागेल. 'लग्न म्हणजे जीवनाचे अंतिम ध्येय नाही', असा विचार तरुणांमध्ये दृढ होत आहे. त्यांना वैयक्तिक स्वातंत्र्य हवे आहे, आपल्या आयुष्याचा अर्थ स्वत: ठरवायचा आहे. काहींना लग्न नको असते, तर काहींना योग्य जोडीदार न मिळाल्याने ते थांबतात. पण समाज मात्र या वैयक्तिक निर्णयाला सहज स्वीकारायला तयार नाही.राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातही हेच चित्र दिसते. राहुल गांधी, आदित्य ठाकरे, प्रणिती शिंदे, अदिती तटकरे यांसारख्या तरुण नेत्यांबद्दल माध्यमांमध्ये त्यांच्या लग्नाबाबत नेहमीच चर्चा होते. सलमान खानसारखा लोकप्रिय कलाकार लग्न करत नाही, हेही लोकांना खटकते. समाजात अजूनही लग्न हा एखाद्या व्यक्तीच्या 'पूर्णत्वाचा' निकष मानला जातो. त्यामुळे अविवाहित व्यक्तीबद्दलची उत्सुकता कधी कमी होत नाही. या सर्व घटनांतून एक गोष्ट स्पष्ट होते, लग्न हा विषय केवळ वैयक्तिक नाही, तर तो सामाजिक आणि सांस्कृतिक संरचनेचा अविभाज्य भाग आहे. लग्न न होण्याची समस्या फक्त शहरांपुरती मर्यादित नाही. ग्रामीण भागात ती अधिक तीव्र आहे. शिक्षणाच्या संधींचा अभाव, आर्थिक दुर्बलता, शेतीतील अनिश्चितता, जातीय बंधने आणि समाजातील परंपरागत विचारसरणी यामुळे तिथल्या तरुणांना लग्न करणे अधिक कठीण जाते. दुसरीकडे, शहरी भागात लग्न उशिरा होण्याचे कारण म्हणजे उच्च शिक्षण, नोकरीतील ताण, योग्य जोडीदार शोधण्यातील अडचणी आणि वैयक्तिक स्वातंत्र्याबद्दलची जाणीव.म्हणजेच, दोन्हीकडे समस्या आहे, पण स्वरूप भिन्न आहे. समाजाने या बदलत्या वास्तवाकडे समजुतीने पाहण्याची गरज आहे. तरुणांच्या अपेक्षा अवास्तव असतील तर त्या कमी करणे आवश्यक आहे, परंतु त्यांच्या स्वप्नांवर गदा आणता कामा नये. पालकांनी, समाजाने आणि शासनाने या विषयावर खुला संवाद घडवून आणावा. गावागावांत युवक-युवतींसाठी संवाद, समुपदेशन आणि विवाहयोग कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. आर्थिक परिस्थितीमुळे लग्न न होणार्यांसाठी शासनाने विशेष योजना आखल्या पाहिजेत. ग्रामीण भागातील तरुणांना आत्मनिर्भर बनविणे, शिक्षण व रोजगाराच्या संधी वाढविणे आणि त्यांना आत्मविश्वास देणे हेच या समस्येवरचे खरे उत्तर आहे. शरद पवारांना लिहिलेले पत्र हे कदाचित एका तरुणाचा हताश प्रयत्न असेल, पण त्या पत्राने समाजाला आरसा दाखवला आहे. तो आरसा सांगतो, आपण शिक्षित झालो, आधुनिक झालो, पण अजूनही माणसाच्या एकटेपणाकडे दुर्लक्ष करत आहोत. अशा एकटेपणात हरवलेल्या चेहर्यांमध्ये अकोल्याच्या त्या तरुणाचा चेहराही आहे.. साधा, प्रामाणिक, पण आतून थकलेला! त्याचे पत्र हसत-खेळत सोशल मीडियावर फिरत असले तरी ते आपल्या समाजाला एक प्रश्न विचारते, 'लग्नाचे वय कोण ठरवते? समाज की व्यक्ती?' आणि हा प्रश्न ज्या दिवशी आपण मनापासून विचारू लागू, त्या दिवशी या विषयावरचे हसे नाहीसे होईल आणि संवेदनशीलता उरेल.

# मेळघाटात मातेसह नवजात अर्भकाचा मृत्यू

## धारणी उपजिल्हा रुग्णालयातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७मेळघाट**

मेळघाटातील कुपोषण, माता आणि बालमृत्यूसंदर्भात उच्च न्यायालयानं शासनावर ताशेरे ओढले आहे. त्यानंतरही धारणी उपजिल्हा रुग्णालयात शनिवारी अर्भकासह मातेचा आणि एका नवजात बालकाचा मृत्यू झाल्यानं खळबळ उडाली. नर्मदा चिलात्रे असं मृत मातेचं नाव आहे.




धारणी उपजिल्हा रुग्णालयात शनिवारी प्रसूतीसाठी दाखल असणाऱ्या सालाई गावातील नर्मदा चिलात्रे यांचा प्रसूतीदरम्यान मृत्यू झाला. त्यांच्या गर्भात असणारं अर्भकही दगावलं. धूळघात रेल्वे इथल्या कविता धांडे यांनी धारणी उपजिल्हा रुग्णालयात बाळाला जन्म दिला. हे बाळ देखील अवघ्या काही तासांनी दगावलं. या घटनांमुळे धारणी उपजिल्हा रुग्णालयात हळहळ व्यक्त करण्यात आली.

प्रसूतीसाठी धारणी उपजिल्हा रुग्णालयात ८ नोव्हेंबरला दाखल झालेल्या अर्चनाशिवकार यांच्या शरीरात हिमोग्लोबीन कमी असल्यामुळं त्यांची प्रकृती खालावली. ९ नोव्हेंबरला त्यांनी उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला. ६ नोव्हेंबर रोजी रंजना साखरकर यांना रुग्णवाहिकेतून धारणी उपजिल्हा रुग्णालयात आणलं जात असताना त्यांचा मार्गातच मृत्यू झाला. आठ दिवसात घडलेल्या या चार घटनांमुळे मेळघाटातील माता आणि बालमृत्यूचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.मेळघाटात अकरा महिन्यात ६५ बालकांचा मृत्यू झाल्यानं मुंबई उच्च न्यायालयानं सरकारच्या कामावर नुकतेच ताशेरे ओढले. मेळघाटातील या परिस्थितीबाबत सामाजिक कार्यकर्ते बंड्या साने आणि डॉ. राजेंद्र वर्मा यांनी जनहित याचिका दाखल केली. मेळघाटातील माता आणि बालमृत्यू रोखण्यासाठी जिल्हा समिती आहे, मात्र तिची गांभीर्यानं बैठक होत नाही. राज्य पातळीवर असणारी गाभा समिती पणलक्ष देत नाही. कोणताचविभाग एकत्र येत नसल्यामुळं मेळघाटात आदिवासींवर संकटं आहेत. कृषी विभागसुद्धा आदिवासींना न्याय मिळवून देण्यास अपयशी आहे. अशा परिस्थित माता मृत्यू आणि बाल मृत्यूसारख्या गंभीर विषयात न्यायालयाशिवाय दुसरा पर्याय नाही असं वाटलं.

> **प्रयत्न करुनही वाचवू शकलो नाही**
>
> आम्ही प्रयत्न करूनही त्यांना वाचवू शकलो नाही. एकाच वेळी जास्त प्रमाणात प्रसूती आणि बालकांचे आणि मातांचे उपचार करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य होत नाही. यंत्रणेला अनुसरूनच उपचार करणं शक्य आहे.
>
> **डॉ. दयाराम जावरकर,**
> (वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय धारणी.)




## शुद्ध मध कसं ओळखायचं, घरच्या घरी या दोन टेस्ट करा अन् शुद्ध मध ओळखा!

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**

मध आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. तो केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी वरदान देखील मानला जातो. मात्र आजकाल बाजारात खरा आणि बनावट मध ओळखणे कठीण झाले आहे. शुद्ध मध कसा ओळखायचे ते जाणून घेऊया.

**वाढत्या मागणीतही भेसळ वाढतेय** -आजकाल मधाची मागणी जास्त आहे. याचा फायदा घेत अनेक कंपन्या बनावट किंवा भेसळयुक्त मध विकत आहेत. बनावट मधाची चव खऱ्या मधासारखीच असते, परंतु त्यात असलेले रसायने आणि सिरप शरीरासाठी, विशेषत: यकृत आणि मूत्रपिंडांसाठी हानिकारक असल्याचे तज्ञ सांगतात.

**बनावट मधात काय भेसळ असते ?**- तज्ञ सांगतात की, बाजारात उपलब्ध असलेल्या बहुतेक बनावट मधात कॉर्न सिरप आणि रिफाइंड शुगर सिरपची भेसळ असते. हे सिरप बहुतेकदा चीनमधून आयात केले जातात आणि प्रक्रिया केल्यानंतर त्यांचा रंग आणि चव खऱ्या मधासारखी बनवली जाते. म्हणूनच सामान्य ग्राहकांना ते ओळखणे कठीण जाते.

**शुद्ध मध आरोग्यासाठी का महत्त्वाचा आहे ?**- शुद्ध मधात नैसर्गिक एंजाइम, जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. ते ऊर्जा प्रदान करतात, रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात आणि पचनास मदत करतात.




तथापि, बनावट मधात या पोषक तत्वांचा अभाव असतो. भेसळयुक्त मध जास्त काळ सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते आणि यकृत आणि मूत्रपिंडांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

**घरच्या घरी शुद्धता कशी ओळखावी ?**

पाण्यात टाकून पहा

एका ग्लास पाण्यात एक चमचा मध टाका.

शुद्ध मध जाड असते आणि तळाशी स्थिर राहते.

शुद्ध मध पाण्यात लवकर विरघळते.

कागदावर टाकून पहा , पांढऱ्या कागदावर मधाचे काही थेंब टाका. शुद्ध मध जाड असते, ते पसरत नाही.

भेसळयुक्त मध पातळ असतो आणि कागदावर डाग पडतो.

# गहू पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया का महत्वाची असते? ती कशी करावी

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**

गव्हाची बागायती वेळेवर पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. वेळेवर पेरणीसाठी फुले समाधान, त्र्यंबक, तपोवन, फुले सात्विक, एम.ए.सी.एस ६२२२, एम.ए.सी.एस ६४७८, डी.बी.डब्लू. १६८ या सुधारित वाणांचा वापर करावा. पेरणीसाठी प्रती हेक्टर १०० किलो बियाण्यांचा वापर करावा.

**बीजप्रक्रियेसाठी...**

पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम (७५% डब्लू. एस. ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास प्रक्रिया करावी.

बियाणे वाळवल्यानंतर प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम

अझोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळ विणाऱ्या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी.

**बियाण्यास गुळाच्या थंड पाण्यात मिसळून चोळावे.**

असे बीजप्रक्रिया केलेले बियाणे तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी.




**बीजप्रक्रियेमुळे उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ होते.**

मावा किडीच्या नियंत्रणासाठी...

तसेच मावा किडीचा नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम ३० एफ. एस. ७.५ मिली प्रति १० किलो बियाणे प्रमाणे बीजप्रक्रिया करावी.

**पेरणीच्या वेळी जमिनीत पुरेशी ओल असावी.**

पेरणी ५ ते ६ सेंमी खोल करावी. त्यामुळे उगवण चांगली होते.

बागायती वेळेवर गव्हाची पेरणी करतांना दोन ओळीत २० सेंमी अंतर ठेवून करावी.

पेरणी उभी आडवी अशी दोन्ही बाजूने न करता एकेरी करावी म्हणजे आंतरमशागत करता येते.

बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा म्हणजे बी व्यवस्थित दबून झाकले जाते.

बागायती वेळेवर पेरलेल्या गहू पिकास पेरताना प्रती हेक्टरी ६० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश द्यावे.

- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी

# अमरावतीत २०, २१ डिसेंबरला तिसरे परिवर्तन साहित्य संमेलन:

## चंद्रकांत वानखडे अध्यक्ष, सुदर्शन जैन उद्घाटक, डॉ. निकम स्वागताध्यक्ष

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१७ अमरावती**

अमरावती येथे २० व २१ डिसेंबर रोजी तिसरे परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. शेगाव नाका येथील अभियंता भवन येथे हे संमेलन पार पडणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक, शेतकरी आंदोलक चंद्रकांत वानखडे यांची संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. भारतीय जैन संघटनेचे सुदर्शन गांग (जैन) यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होईल, तर निवृत्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. श्यामसुंदर निकम स्वागताध्यक्ष असतील.

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून हे संमेलन आयोजित केले जात आहे. संमेलनाच्या मुख्य आयोजिका डॉ. शोभाताई रोकडे यांनी ही माहिती दिली. नुकतीच संमेलनाच्या आयोजन समितीची एक महत्त्वाची बैठक अभियंता भवन येथे पार पडली, ज्यात सर्वानुमते या निवडींवर शिक्कामोर्तब करण्यात आले.

संमेलनाध्यक्ष चंद्रकांत वानखडे हे ज्येष्ठ साहित्यिक, शेतकरी आंदोलक आणि समाजसेवक म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्राच्या परिवर्तनाच्या चळवळीतील ते प्रमुख कार्यकर्ते आहेत. बिहारमधील भीषण दुष्काळासाठी स्थापन झालेल्या 'तरुण शांती सेना' या चळवळीत त्यांचा सहभाग होता. १९७५ च्या आणीबाणीत त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला होता. आणीबाणीनंतर जयप्रकाश नारायण यांच्या छात्र युवा संघर्ष वाहिनीचे कार्यकर्ता म्हणून त्यांनी यवतमाळ जिल्ह्यातील मेटीखेडा या खेडेगावात २० वर्षे वास्तव्य केले. 'शेतकरी आत्महत्या', 'एका साध्या सत्यासाठी', 'असे छळले राजबंद्यांना', 'आपुलाची वाद आपणांसी' आणि 'गांधी का मरत नाही' ही त्यांची काही प्रसिद्ध पुस्तके आहेत.



या संमेलनात विविध कार्यक्रमांची मेजवानी असणार आहे. यामध्ये ग्रंथदिंडी, प्रकट मुलाखत, परिसंवाद, वऱ्हाडी कविसंमेलन, निमंत्रितांचे दोन कविसंमेलने, कथाकथन, बालकविसंमेलन आणि ज्येष्ठ साहित्यिकांचा सन्मान सोहळा यांचा समावेश आहे.

संमेलनाच्या निमित्ताने कथा व काव्यस्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमधील सर्वोत्कृष्ट तीन क्रमांकांना रोख रक्कम आणि प्रशस्तिपत्रकासह सन्मानित केले जाईल. याव्यतिरिक्त, समाजसेवा, साहित्य, कला, आरोग्य आणि पत्रकारिता या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामवंतांना 'परिवर्तन पुरस्कारा'ने गौरवण्यात येणार आहे. तसेच, विविध नामवंत साहित्यिकांच्या पुस्तकांचे विमोचनही या संमेलनात केले जाईल.

# विधान परिषदेच्या पदवीधर, शिक्षक मतदारसंघासाठी मतदार यादी तयार करण्याचे सुधारीत वेळापत्रक जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती,**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी दि. १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नवीन मतदार यादी (De-nova Electoral Roll) तयार करण्याचे सुधारीत वेळापत्रक भारत निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे.

त्यानुसार महत्वाच्या टप्प्यांचे सुधारीत वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

मतदार नोंदणी अधिनियम, १९६० नुसार या पुनरिक्षण कार्यक्रमाचे टप्पे आखण्यात आले आहे. त्यानुसार आता हस्तलिखिते तयार करणे आणि प्रारुप मतदार याद्यांची छपाई ही दि. २८ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत करण्यात येणार आहे. त्यानंतर ३ डिसेंबर २०२५ रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी करण्यात येणार आहे.

या मतदार याद्यांवर ३ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. दावे व हरकती ५ जानेवारी २०२६ रोजी निकाली काढण्यात येतील. याच दिवशी पुरवणी यादी तयार करणे व छपाई करण्यात येणार आहे. त्यानंतर १२ जानेवारी २०२६ रोजी मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी करण्यात येणार आहे,




असे अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी तथा विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी पत्राव्दारे कळविले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १७ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांना हैदराबादहून धमकीचा मेल

## राजापेठ व येवदा पोलिसात तक्रार दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

शहरात तीन ते चार दिवसांआधी इस्लामिक इन्फॉर्मेशन सेंटरचे फलक पंचवटी चौकात लागल्याचे प्रकरण उजेडात आले होते. या बॅनरविरोधात आवाज उचलत इस्लामच्या प्रचाराचे फलक मुख्य चौकांमध्ये लागतातच कसे, असा प्रश्न राज्यसभा खा. डॉ. अनिल बोंडे यांनी पोलिसांना विचारला होता. त्यानंतर डॉ. बोंडे यांना हैदराबादहून १५ नोव्हेंबरच्या रात्री १२ वाजताच्या सुमारास धमकीचा मेल आला आहे. यात अपनी जुबांन और बयान पर सख्त काबू रखो, अशी समज देण्यात आली आहे. शनिवारी रात्री आलेल्या या मेलनंतर डॉ. बोंडे यांच्या कार्यालयाने राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

अस्सलाम वालेकुम डॉ. साहेब, इस्लामिक इन्फॉर्मेशनच्या विरोधात आपण जे शब्द वापरले त्यामुळे हैदराबदमधील मुस्लीमांच्या मनात आग लागली आहे. तेथीलवातावरण तापले आहे. तुमच्या बोलण्याने आमच्या मजहबी गैरतला मोठा धक्का



बसला आहे. तो राग आता आमच्या लोकांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असून ज्येष्ठ, तरुण, युवकांच्या मनावर आता ताबा राहिला नाही.

आपण आग लावली तिचा धूर आता दाट झाला आहे. ही आमच्यासाठी जखम असून तिच्या वेदना जाणवत आहेत. त्यामुळेच तुम्ही तुमच्या जिभेवर आणि विधानांवर संयम ठेवा. कारण, यावेळी आम्हाला स्वत:ला आवरणे कठिण झाले आहे. यापुढे एकही चुकीचा शब्द वातावरण बिघडवण्यासाठी पुरेसा ठरू शकतो, असे या ई-मेलमध्ये म्हटले आहे.

शेवटी हैदराबादची नाराज मुस्लीम बिरादरी असा उल्लेख आहे. मेलमध्ये हैदराबादी भाषेची ढब स्पष्टपणे दिसून आली आहे.

आपने जो आग लगाई है, उसका धुआँ बहुत गाढा हो चुका है, असे शब्द मेलमध्ये आहेत. मेल पाठवणाऱ्यांविरोधात तातडीने कारवाई करावीअशी मागणी करण्यात आली आहे.

### मी माझे कर्तव्य करीत आहे

मी जनतेचा प्रतिनिधी म्हणून जे माझे कर्तव्य आहे. माझ्या वक्तव्याचा हैदराबाद येथील लोकांना त्रास झाला त्यासाठी मी काय करू शकतो? मी बॅनरविरोधात आवाज उठवला, बस एवढेच. **- डॉ. अनिल बोंडे, राज्यसभा खासदार.**

उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून विद्यापीठांचे मुल्यांकन

# राज्यातील मुल्यांकनात अमरावती विद्यापीठ तिसऱ्या क्रमांकावर

## ६८ गुणांसह गोंडवाना विद्यापिठ राज्यात पहिले अमरावतीच्या संगाबा विद्यापिठाला ६२ गुण

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७अमरावती**

राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने राज्यातील १३ अकृषी विद्यापीठांच्या केलेल्या मूल्यांकनात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अनुत्तीर्ण ठरले आहे. या मूल्यांकनात पुणे विद्यापीठ शेवटच्या स्थानी असून, गोंडवाना विद्यापीठाने पहिला क्रमांक पटकावला आहे. तर अमरावतीचे संत गाडगेबाबा विद्यापिठ तिसऱ्या क्रमांकावर आहे.




त्या खालोखाल मुंबई विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठाने स्थान मिळवले आहे. या मूल्यांकनातील गुणांकन पाहता विद्यापीठांनी निकष पूर्ततेकडे पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे. उच्च व तंत्रशिक्षणविभागाने याबाबतचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. सेवाशर्ती कार्यक्रमाअंतर्गत आकृतिबंध, सेवा प्रवेश नियम, अद्ययावत ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करणे, पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती, सरळसेवा नियुक्ती रिक्त पद स्थिती, बिदुनामावली प्रमाणीकरण, अनुकंपा नियुक्ती, आयजीओटी पोर्टलवर नोंदणी आणि पाच अभ्यासक्रम पूर्ण करणे, सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत करून डिजिटल करणे या निकषांवर मूल्यांकन करण्यात आले. राज्यातील सार्वजनिकविद्यापीठांमध्ये गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठाने सर्वाधिक ६८ गुणांसह क्रमवारीत अग्रस्थान पटकावले. तर मुंबई विद्यापीठ आणि कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने प्रत्येकी ६६ गुण मिळवले. अमरावतीच्या संत डगेबाबा विद्यापीठाला ६२, नाशिकच्या बव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला ६०, . एन. डी. टी. महिला विद्यापीठाला ५७, मी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला ५६, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूरं विद्यापीठाला ५४, रामटेक येथील कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाला प्रत्येकी ५२, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला ५०, तर जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला ४८ गुण मिळाले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ४२ गुणांसह सर्वांत शेवटच्या स्थानी आहे. पुणे विद्यापीठाला आकृतिबंध, आयजीओटी पोर्टलवर नोंदणी व ५ कोर्सअभ्यासक्रम अभ्यासक्रम पूर्ण करणेकरणे, कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत व डिजिटल करणे या तीन गटांत १० पैकी शून्य गुण मिळाले आहेत. आकृतिबंध या निकषावर केवळ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या एकमेव विद्यापीठाला दहा गुण मिळाले असून, उर्वरित सर्व विद्यापीठांना शून्य गुण मिळाले आहेत. तर आयजीओटी पोर्टलवर नोंदणीव५ अभ्यासक्रम पूर्ण करण्यात एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाला एक गुण, गोंडवाना विद्यापीठाला दोन गुण मिळाले असून, उर्वरित सर्व विद्यापीठांना शून्य गुण आहेत.

# चिखलदरा तालुक्यात शिक्षकांची तीव्र टंचाई, हतरू आणि एकताई केंद्रांचा शैक्षणिक कोंडमारा

## पालकांचा नवीन शिक्षक येईपर्यंत विद्यार्थ्यांना शाळेत न पाठविण्याचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७चिखलदरा**

चिखलदरा तालुक्यातील आदिवासी बहुल हतरू आणि एकताई या दोन केंद्रांमध्ये शिक्षकांची अभूतपूर्व आणि गंभीर टंचाई निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना शिक्षकांची कमतरता वाढतच असून, अनेक शाळा केवळ एका शिक्षकाच्या भरवशावर चालवल्या जात आहेत. या परिस्थितीत गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे केवळ अशक्य झाले असून, संतप्त स्थानिक पालकांनी जोपर्यंत दुसरा शिक्षक शाळेत येत नाही, तोपर्यंत आपल्या पाल्यांना शाळेत न पाठवण्याचा तीव्र इशारा दिला आहे. या शैक्षणिक कोंडमाऱ्यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे.

### बदलीनंतरही शिक्षक अडकले: 'न कार्यमुक्त, न नियुक्ती!'

या केंद्रांमधील शैक्षणिक कोंडमारा अधिक गंभीर होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे प्रशासनाचा गोंधळ आहे. हतरू तसेच एकताई केंद्रामध्ये मागील एक वर्षापासून जवळपास सर्व शिक्षकांच्या बदल्या होऊन देखील, त्या ठिकाणी पर्यायी शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे त्यांना कार्यमुक्त केलेले नाही.जे शिक्षक नवीन ठिकाणी बदली होऊन जाण्यासाठी उत्सुक आहेत, ते जुन्याच शाळेत अडकून पडले आहेत आणि त्यांच्या बदल्यांचे आदेश असूनही ते रुजू होऊ शकत नाहीत. यामुळे त्यांची मानसिक कुचंबणा होत आहे, तसेच बदली प्रक्रियेचे उद्दिष्टही पूर्ण झालेले नाही. या परिस्थितीमुळे शिक्षक आणि विद्यार्थी असे दोघेही त्रासात आहेत.

**एकताई केंद्राची हृदयद्रावक स्थिती: संपूर्ण शाळा एका शिक्षकावर**

एकताई केंद्रातील परिस्थिती तर अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे. येथे एकूण ९ शाळा असून, केवळ ९ नियमित शिक्षक उपलब्ध आहेत. याचा अर्थ स्पष्ट आहे - प्रत्येक शाळेत केवळ १ शिक्षक संपूर्ण कामाचा भार सांभाळत आहे!

जि.प. शाळा - मंजूर शिक्षक - उपलब्ध शिक्षक - एकताई - ३ - १ , खुटीदा - २ - १ , सलीता - २ - १ , सुमिता ।२।१ , भांडूप - २ - १ रुईपठार - २ - १ , भुत्रुम - ३ - १ , डोमी - २ - १ , कुही - २ - १ - एकूण - २० - ९

एका शिक्षकावर शाळेच्या प्रशासकीय, शैक्षणिक आणि सातत्याने येणाऱ्या गैर-शैक्षणिक कामांचा (उदा. सर्वेक्षण, ऑनलाईन कामे, अहवाल, इडज) प्रचंड ताण आहे. परिणामी, प्रशिक्षण, रजा किंवा बैठकांसाठी देखील या शिक्षकांना शाळेबाहेर पडणे शक्य होत नाही, कारण शाळा बंद ठेवावी लागते.

**हतरू केंद्रातही बिकट अवस्था-** हतरू केंद्रातील ८ शाळा 'द्विशिक्षकी' मंजूर असताना, तिथे केवळ ७ नियमित शिक्षक आणि ३ कंत्राटी शिक्षक उपलब्ध आहेत. प्रशिक्षण, रजा, अर्जित रजा, ऑनलाईन काम, बँक व्यवहार, शिक्षण परिषद, मुख्याध्यापक सभा, अहवाल सादरीकरण आणि इडज सर्वेक्षण यांसारखी सततची कामे बघता, या अत्यल्प मनुष्यबळावर गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणे हे शिक्षकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी एक शैक्षणिक कोंडमारा बनले आहे.

### पालकांचा तीव्र संताप: शिक्षक नाही, तर विद्यार्थ्यांना शाळेत पाठवणार नाही!



बदली, कंत्राटी भरती प्रक्रियेत या दुर्गम भागाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे आणि बदलीनंतरही शिक्षकांना कार्यमुक्त न केल्यामुळे स्थानिक पालकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे. चार बदली प्रक्रिया आणि दोन कंत्राटी भरती होऊनही या केंद्रांना केवळ तीन कंत्राटी शिक्षक मिळाले आहेत, तर एकही नियमित शिक्षक दिला गेला नाही.आम्ही आमच्या मुलांचे भविष्य असे धोक्यात घालू शकत नाही. केवळ एका शिक्षकावर शाळा चालवणे म्हणजे मुलांच्या शिक्षणाची चेष्टा आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक पालकांनी दिली आहे. 'जोपर्यंत दुसरा नियमित शिक्षक आमच्या शाळेत येत नाही आणि बदली झालेले शिक्षक कार्यमुक्त होत नाहीत, तोपर्यंत आम्ही आमच्या पाल्यांना शाळेत पाठवणार नाही,' असा स्पष्ट इशारा पालकांनी प्रशासनाला दिला आहे.


**प्रशासनाला तातडीने उपाययोजनेची मागणी**

या दोन्ही केंद्रांमधील शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे भवितव्य वाचवण्यासाठी खालील मागण्या तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे: एकताई केंद्राला तातडीने ११ शिक्षकांची नियुक्ती करावी. हतरू केंद्राला तातडीने ६ शिक्षकांची नियुक्ती करावी. बदली झालेल्या शिक्षकांना तातडीने कार्यमुक्त करून त्या जागी नवीन शिक्षकांची नियुक्ती करावी. लवकरात लवकर कंत्राटी शिक्षक उपलब्ध करून देण्यात यावेत. शिक्षकांना गैर-शैक्षणिक कामातून (उदा. सर्वेक्षण, ) दिलासा द्यावा.शिक्षकांच्या कमतरतेमुळे शिक्षण व्यवस्थित चालत नाही, ही प्रशासनाची अडचण खरी असली तरी, दुर्गम भागातील गरीब विद्यार्थ्यांचे भविष्य यावर अवलंबून आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून शिक्षक भरती, पुनर्वाटप आणि बदलीनंतर शिक्षकांना कार्यमुक्त करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

# महापालिकेच्या आरक्षणावर आजपासून नोंदविता येणार आक्षेप

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७अमरावती -** अमरावती महापालिकेच्या प्रभाग निहाय प्रारूप आरक्षणावर आक्षेप वा सूचना नोंदविण्याची प्रक्रिया सोमवार १७ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून २४ नोव्हेंबरपर्यंत ही मुदत देण्यात आली आहे.

महापालिकेचे प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण मंगळवार, ११ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध झाले होते. त्यानुसार २२ प्रभागांतील ८७पैकी अनुसूचित जाती (एससी) साठी १५ जागा, अनुसूचित जमाती (एसटी) साठी २, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) साठी २३, तर सर्वसाधारण (ओपन) प्रवर्गासाठी ४७ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. तसेच या ८७ पैकी ४४ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यामध्ये एससी महिलांसाठी ८, ओबीसी (ना.मा.प्र) महिलांसाठी १२, एसटी महिलेसाठी १, तर सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसाठी २३ अशाप्रकारे एकूण ४४ जागा महिलांसाठी



आरक्षित आहे; मात्र यापैकी कोणत्याही जागेच्या आरक्षणावर राजकीय पक्षांना किंवा उमेदवारांना काही आक्षेप असल्यास, त्यांनी ते आक्षेप वा सूचना २४ नोव्हेंबरपर्यंत राजकमल चौकातील महापालिकेच्या मुख्य इमारतीमधील निवडणूक विभागात दाखल करण्याचे आवाहन प्रशासक तथा आयुक्त सौम्या शर्मा यांनी केले आहे.

# अमारावती जिल्ह्यात पाणी सुरक्षेला गती

## ६००हून अधिक ग्रामपंचायती ग्रीनझोनमध्ये

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७अमरावती -** जिल्ह्यात पाण्यामार्फत पसरणाऱ्या आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हा परिषदेकडून राबविण्यात आलेल्या पाणी तपासणी मोहिमेत महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर आले आहेत. या मोहिमेत जिल्ह्यातील ६०४ ग्रामपंचायतींना ग्रीनकार्ड तर २३१ ग्रामपंचायतींना पिवळे कार्ड देण्यात आले आहे.

पिवळे कार्डधारक ग्रामपंचायतींना तातडीने सुधारित उपाययोजना करून ग्रीनकार्ड श्रेणीत आणण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे आहे.मागील वर्षी काही गावांमध्ये जलजन्य आजारांचा उद्रेक झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयित कृती आराखडा तयार करण्यात आला. त्याअंतर्गत साथरोग नियंत्रणकक्षाची स्थापना करून व्यापक सर्वेक्षण हाती घेण्यात आले.या सर्वेक्षणात जलस्त्रोतांच्या परिसराची स्वच्छता, शौचालय व गोठे यांचे अंतर, जलवाहिन्यांमधील लिकेज, टाक्यांची स्थिती, क्लोरिनचे प्रमाण, तसेच स्रोतातील पाण्याची गुणवत्ता यासह सर्व बाबी तपासण्यात आल्या. विशेष म्हणजे, यापूर्वी जिल्ह्यात रेडकार्ड असलेल्या ग्रामपंचायतीही होत्या; मात्र या वर्षी एकही ग्रामपंचायत रेडकार्ड श्रेणीत राहिलेली नाही, ही सकारात्मक बाब आहे.पिवळे कार्डधारक ग्रामपंचायतींना योग्य ती पावले उचलण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या असून, त्यांना लवकरात लवकर ग्रीनकार्ड मिळावे यासाठी उच्चस्तरीय समितीमार्फत सातत्याने देखरेख ठेवण्यात येणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना सांगितले.

# नगर परिषद, नगर पंचायत निवडणूक आता चरम सीमेवर

## भाजप १२, काँग्रेसचे १० नगराध्यक्षपदाचे उमेदवार जाहिर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती-**

पालिका निवडणूक आता चरम सीमेवर आली आहे. युती, आघाडी करण्याचे गहाळ आटोपत नसून उमेदवारी प्राप्त करण्यासाठी चढाओढ आहेच. सर्वाधिक गर्दी भाजपच्या उमेदवारीसाठी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सर्वच इच्छुक भाजप नेत्यांचे उंबरठे झिझवत आहे. आज सोमवार १७ नोव्हेंबर नामांकनाचा शेवटचा दिवस.. मात्र प्रमुख पक्षांनी सर्व प्रभागाचे तसेच नगराध्यक्षपदाचे उमेदवार अधिकृतपणे जाहीर केलेले नाही. असे असले तरी विश्वसनीय सूत्राने दिलेल्या माहितीनुसार रविवारला सायंकाळी भाजपने आपले १० नगर परिषद आणि २ नगर परीषदेसाठी अध्यक्षपदाचे नावे निश्चित केली आहे. तर काँग्रेसने



सुद्धा १० अध्यक्षपदाची नावे फायनल केली असून सोमवारला सकाळी औपचारीक घोषणा होईल.

तिकीट मिळण्यासाठी चांगलीच रस्सीखेच दिसून येत आहे. या यादीत नव्या, जुन्याचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून येते. मात्र अनेक दिग्गज उमेद्वारांना घरी बसविण्यात आल्याचेही स्पष्ट होत आहे. भाजप उमेदवारीसाठी चढाओढ असल्याने उमेदवारी जाहीर करण्यात अनेक कसरती कराव्या लागत आहे.

**भाजप नगराध्यक्षपदाचे उमेदवार-** अंजनगाव सुर्जी - अविनाश गायगोले, चिखलदरा - राजेंद्रसिह सोमवंशी अचलपूर - रुपाली अभय माथने दर्यापूर - नलिनी प्रकाश भारसाकळे चांदूर बाजार - कांता अहीर चांदूर रेल्वे - स्वाती मेटे मोर्शी - रश्मी उमाले वरूड - ईश्वर सलामे शेंदूरजना घाट - सवर्णा वरखेडे, धामणगाव रेल्वे - अर्चना रोठे नांदगाव खंडेश्वर - स्वाती पाठक, धारणी - सुनील चौथमल

**काँग्रेस नगराध्यक्षपदाचे उमेदवार-** अचलपूर :- नुरुस सहबा येतेशाम नबील , चांदूर बाजार:- फरहाना तब्बसुम जावेद. , अंजनगाव सुर्जी :- आशाबानो रशीद खान., दर्यापूर:- मंदा सुधाकर भारसाकळे, धामणगाव रेल्वे:- वर्षा वसंतराव देशमुख, चांदुर रेल्वे :- पूनम निलेश (शीम) सूर्यवंशी, नांदगाव खंडेश्वर:- वीणा निशू जाधव, चिखलदरा :- शेख अब्दुल शेख हैदर., धारणी:-राजकिशोर मालवीय, मोर्शी:- दिपाली विपुल भडांगे

### भाजप-काँग्रेसमध्ये मुख्य लढत

जिल्ह्यातील दहा नगरपालिका आणि दोन - नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांची मोठी संख्या पाहता या निवडणुकीमधील चुरस चांगलीच वाढली आहे. जिल्ह्यात महायुतीतील घटक पक्षांनी अद्यापही एकवाक्यता न दाखवल्याने भाजपने स्वबळावरच लढण्याची तयारी केलीय, असे आजच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार निवडीवरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे प्रमुख लढत ही भाजप आणि काँग्रेसमध्ये होईल, असे सर्वसमावेशक चित्र आहे.

### आज अधिकृत नावे जाहिर करणार जुने-नव्या पदाधिकाऱ्यांचा समन्वय साधत उमेदवारांची निवड

# राजुरवाडी निंभी पिंपळखुटा परिसरातील कृषी पंपांना मिळणार दिवसा वीजपुरवठा !

## हितेश साबळे यांच्या प्रयत्नांना यश !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७मोर्शी–** रब्बी हंगाम सुरू होण्याच्या सुरुवातीलाच महावितरण कंपनीने शेतकऱ्यांच्या शेतातील विजेचे वेळापत्रक बदलवल्यामुळे मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये रोष व्यक्त होत असतांना निंभी राजुरवाडी पिंपळखुटा मोठा परिसरातील हजारो शेतकऱ्यांच्या कृषीपंपाला दिवसा वीज पुरवठा देण्यात यावा तसेच या भागातील ट्रांसफार्मर त्वरित बदली करून रात्रीचा वीज पुरवठा शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरत असून कृषी पंपांना दिवसा वीज

> विद्युत विभागाकडून निंभी राजुरवाडी पिंपळखुटा फिडरवरील ओव्हरलोडींगमुळे निर्माण झालेली समस्या ४५ दिवसामध्ये दूर करण्यात येणार आल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना शेती पंपासाठी आता दिवसा वीज पुरवठा केला जाणार असल्याची माहिती विद्युत विभागाकडून देण्यात आली आहे. दिवसा वीजपुरवठा होणार असल्याने, वन्य प्राण्यांच्या संचारामुळे धास्तावलेल्या परिसरातील हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे-- **हितेश साबळे** सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

पुरवठा करून शेतकऱ्यांच्या शेतातील रात्रीला सिंगल फेज लाईन सुरू करण्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस हितेश साबळे यांनी आक्रमक भूमिका घेऊन कार्यकारी अभियंता मोर्शी यांच्या कार्यालयात ठिय्या मांडून आंदोलन केले होते.

अखेर महावितरण कंपनीने हितेश साबळे यांच्या आंदोलनाची



दखल घेऊन मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी अंतर्गत सर्व कृषी पंप वीज ग्राहकांना दिवसा वीज पुरवठा देण्याच्या हदृष्टीकोनातून ३३ केव्ही उपकेंद्रावरील पॉवर ट्रान्सफॉर्मर क्षमतावाढ करण्याचे काम ४५ दिवसामध्ये पूर्ण करून सर्व कृषी वाहिन्यांवरील कृषिपंप वीज ग्राहकांना दिवसाने वीजपुरवठा करण्यात येईल. निंभी पिंपळखुटा राजूरवाडी भागातील सर्व ट्रान्सफॉर्मर बदलविण्यात आलेले असून हितेश साबळे यांच्या आंदोलनाची दखल घेऊन नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम युद्ध स्तरावर सुरू आल्यामुळे परिसरातील सर्व शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आल्यामुळे महावितरण कंपनीने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर विभागीय कार्यालय, मोर्शी येथे १७ नोव्हेंबर रोजी होऊ घातलेले ठिय्या आंदोलन तूर्त मागे घेण्यात आले असल्याचे हितेश साबळे यांनी यावेळी विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना सांगितले.

## अंबा रुख्मिणी महोत्सव २०२५ मध्ये

# भव्य विदर्भस्तरीय एकता मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

## थंडीच्या दिवसात युवकांचा उत्साह बघून तरुणाईला उजाळा मिळाला: रविराज देशमुख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७कौंडण्यपूर –** कडकडत्या थंडीत तब्बल ५ किलोमीटरचे अंतर पार करून शेकडो स्पर्धकांनी कौंडण्यपूरच्या अंबा रुख्मिणी महोत्सव मध्ये एकच जल्लोष केला. महोत्सव विदर्भाचा, विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक अंबा रुख्मिणी महोत्सव मध्ये भव्य विदर्भस्तरीय एकता मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तब्बल हजारो रुपयांचे बक्षिसे ठेवण्यात आली होती. ज्यामध्ये तब्बल नऊ स्पर्धकांनी यामध्ये बाजी मारली. विशेष म्हणजे यावेळी छोटे स्पर्धक सुद्धा मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. थंडीच्या दिवसात युवकांचा उत्साह बघून तरुणाईला उजाळा मिळाला असे प्रतिपादन यावेळी उदघाटक रविराज देशमुख यांनी मॅरेथॉन स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला केले. सर्वप्रथम पहाटे ६. ०० वाजता सुरु झालेल्या या मॅरेथॉन स्पर्धेचे उदघाटन अंबा रुख्मिणी महोत्सव समितीचे अध्यक्ष व भाजपा जिल्हाध्यक्ष




रविराज देशमुख यांनी केले. यावेळी विशेष अतिथी म्हणून डॉ. उमेश राठी (पी. ई. एफ. आय. विदर्भ चाप्टर), डॉ. अतुल पाटील (सचिव, अमरावती अथेलेटिक असोसिएशन अमरावती), डॉ. कल्याण मालधुरे (अध्यक्ष, बॉडी बिल्डिंग वेट लिफ्टिंग संगाबा), रविंद्रजी हाडे (तिवसा खरेदी विक्री संचालक), प्रेमदास राठोड (सरपंच, गट ग्रामपंचायत कौंडण्यपूर) यांच्यासह आदी मान्यवरांची उपस्थिती होती. आदींची उपस्थिती होती. या स्पर्धेला तब्बल नऊ पारितोषिक ठेवण्यात आले. ज्यामध्ये प्रथम बक्षीस ९,९९९ रुपये (सरपंच, सर्व सदस्य व कर्मचारी गट ग्रामपंचायत कौंडण्यपूर), द्वितीय बक्षीस ८,८८८ रुपये (अंबा रुख्मिणी महोत्सव समिती), तृतीय बक्षीस ७,७७७ रुपये (श्री अंबा रुख्मिणी सांस्कृतिक महोत्सव समिती, श्री क्षेत्र कौंडण्यपूर), चतुर्थ बक्षीस ६,६६६ रुपये (कृणाल कडू, तालुका अध्यक्ष युवा स्वाभिमान पार्टी), पाचवे बक्षीस ५,५५५ रुपये (रविंद्रजी हांडे, संचालक तिवसा खरेदी विक्री संघ), सहावे बक्षीस ४,४४४ रुपये (अंबा रुख्मिणी महोत्सव समिती), सातवे बक्षीस ३,३३३ रुपये (वैभवभाऊ कदम व किशोरभाऊ अनेरकर), आठवे बक्षीस २,२२२ रुपये (गणेश वैरागडे), नववे बक्षीस १,१११ रुपये (प्रफुल देऊळकर)

# दुचाकीची धडक; एक ठार, एक गंभीर:वाहन जळून खाक

## तिवसा येथील बसस्थानकासमोर घडली दुर्घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७तिवसा**
एका भरधाव दुचाकीने महामार्गावरून जाणाऱ्या ५३ वर्षीय व्यक्तीला जबर धडक दिली. यात त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर, एक मुलगी गंभीर जखमी झाली. ही घटना रविवारी १६ नोव्हेंबरला तिवसा बसस्थानकासमोर घडली. संजय नामदेव पाटील रा. शेंदुरजना माहोरा, ता.तिवसा असे मृतकांचे नाव आहे. लक्ष्मी चौरागडे वय १७, रा. नागपूर असे या अपघातात गंभीर जखमी असलेल्या मुलीचे नाव आहे. दुचाकीस्वार राजेंद्र मोरे वय १८, रा.अमरावती हा या अपघातात



किरकोळ जखमी झाला. लक्ष्मी व राजेंद्र हे दोघेही दुचाकीने अमरावतीवरून नागपूरच्या दिशेने जात होते. याच दरम्यान बसस्थानकाकडे महामार्ग ओलांडून जाताना संजय पाटील यांना दुचाकीची धडक बसली तर दुचाकीवरील लक्ष्मी चौरागडे ही या अपघातात गंभीररित्या जखमी झाली. या वेळी घटनास्थळी उपस्थित नागरिकांच्या मदतीने त्यांना तिवसा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले . मात्र उपचार सुरु करण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. दरम्यान लक्ष्मी चौरगडे हिची प्रकृती गंभीर असल्याने तिलाही जिल्हा रुग्णालयात हलवले आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते. मृतक संजय पाटील यांना दुचाकीने फरफटत नेल्याने दुचाकीने पेट घेतला. त्यानंतर नगरपंचायतच्या अग्निशमन बंबने आगीवर नियंत्रण मिळवले. या संदर्भात पोलिस तपास करीत आहे.

# अतिक्रमणांवर हातोडा! रस्त्यांचा श्वास मोकळा;

## शहरातील अतिक्रमणे काढून घ्या, अन्यथा बुलडोजर,

### महानगरपालिकेने दिला अल्टिमेटम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**
शहरात अतिक्रमणांची समस्या अतिशय गंभीर झाली आहे. रस्त्याच्या कडेला किंवा जागा दिसेल तिथे अतिक्रमणे केली जातात. काही तर पक्के शेड ठोकून अतिक्रमणे करतात. या अतिक्रमणांमुळेच शहरात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. आताही महानगरपालिका प्रशासनाने पुन्हा एकदा या अतिक्रमणांना रडारवर घेतलं आहे. शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू झाली आहे. पाहता पाहता अतिक्रमणे जमीनदोस्त होऊ लागली आहेत. काही जणांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेण्यास सुरुवात केली आहे.

माननीय. आयुक्त, यांच्या आदेशान्वये महानगरपालिकेच्यावतीने अतिक्रमण मोहिम सुरू असून आज दिनांक १४ नोव्हेंबर,२०२५ रोजी जेसीपी व चार ट्रक द्वारे जमील कॉलनी मुख्य रस्ता ते ताज नगर पुलापर्यंत वलगाव रोड, येथील असलेले फुटपाथ वरील लोखंडी शेड, काँक्रीट ओटे, अवैध लोखंडी खोके, बल्लीबासे लावून टिनाचे झोपड्या असलेले, सदर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी



अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. जोपर्यंत शहरातील रस्ते व फूटपाथ मोकळे होणार नाही तोपर्यंत ही अतिक्रमणाची कारवाई सुरू राहील. ज्यांनी अतिक्रमण केलं असेल त्या सर्वांनी अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे अन्यथा महानगरपालिका प्रशासन काढून घेईल. तसेच कायदेशीर कारवाईलाही सामोरे जावे लागेल असा इशारा अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त, यांनी दिल्या. या इशाऱ्याने अतिक्रमण धारकांचे धाबे दणाणले आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठ कापड बाजारातील अतिक्रमणांवर देखील लवकरच कारवाई करणार असून त्याबाबत शहरातील इतर भागातील अतिक्रमणे मोकळे करून मुख्य शहरातील अतिक्रमणांवर कारवाई करणार असे महानगरपालिकेचे अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त,यांनी दैनिक प्रजासत्ताक ला सांगितले.

# दर्यापूर पालिका निवडणुकीत मताचे विभाजन होण्यासाठी विरोधकांच्या हालचालींना वेग

## मुस्लिम मतांचा पुळका केवळ निवडणुकीपुरताच का ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७दर्यापूर–** दर्यापूर नगरपालिकेची निवडणूक येत्या दोन डिसेंबर रोजी होऊ घातली असून काँग्रेसच्या वतीने सौ मंदाकिनीताई सुधाकरपाटील भारसाकळे या अध्यक्षपदाच्या चेहऱ्यासह नगरसेवक उमेदवारांच्या घोषणा जवळपास निश्चित झाल्या आहेत पालिका निवडणूक प्रचाराने गती सुद्धा घेतली आहे सर्वात अगोदरच अध्यक्षपदाचा चेहरा काँग्रेसने स्पष्ट केला हो त्यांचा वार्डा वार्डात प्रचार सुद्धा सुरू झाला आहे पालिका निवडणूकीत काँग्रेस सोबत सर्वसामान्य मतदार व विविध पक्षातील पदाधिकारी सुद्धा विजयासाठी एकवटले आहेत काँग्रेस पक्षाच्या विजयामध्ये आडकाठी निर्माण व्हावी यासाठी मोठ्या प्रमाणावर मोर्चे बांधणी सुरू आहे काँग्रेस पक्ष व त्यामधील पदाधिकारी कार्यकर्ता हा पक्षासोबत एकनिष्ठ असून पालिका निवडणुकीत ताकदनीशी उतरला असल्याचे प्रतिपादन सुधाकर पाटील भारसाकळे यांनी विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना केले गेल्या एक-दोन दिवसापासून मुस्लिम मतदारांची मते मिळवण्यासाठी विरोधकांनी अनोख्या



युक्त्या लढवल्या आहेत मुस्लिम नागरिकांचा व मतदारांचा पुळका केवळ निवडणुकीपुरताच का ? असे यावरून स्पष्ट होते दर्यापूर पालिकेतील मताचे विभाजन होण्यासंदर्भात काँग्रेस विरोधक पक्षांनी हालचाली केल्या आहेत यामध्ये दर्यापूर बनोसा बाभळी सह ग्रामीण भागातील हद्द वाढ झालेल्या परिसरात काँग्रेसचा बोलबाला असल्याचे सुधाकर भारसाकळे यांनी व्यक्त केले काँग्रेस पक्ष सर्वधर्म समभाव जपून पालिका निवडणूक लढवणार आहे तसेच आमच्या पक्षात कुठलाही अंतर्गत कलह नसून विरोधकांनी काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत गटबाजी संदर्भात

### सुधाकर पाटील भारसाकळे यांचे प्रतिपादन

प्रचारात अफवा पेरू नये असे कणखर मत सुधाकर पाटील भारसाकळे यांनी स्पष्ट केले. पालिका निवडणुकीमध्ये मते मागण्यासाठी आम्ही जात असून मतदारांचा वाढता पाठिंबा मिळत आहे यासह विकासाच्या मुद्द्यावर भौतिक सोयी सुविधा रस्ते शिक्षण आरोग्य पालिकेतील अद्यावत प्रणाली या विकासाच्या मुद्द्यावर काँग्रेस पक्षाची वाटचाल आहे .

# आणखी पाच दिवस थंडी; २१ पासून तापमान वाढणार

## ५ वर्षात यंदा सलग ५ दिवस पारा १२ अंशांच्या जवळपास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती–**
शहरासह जिल्ह्यात सध्या थंडीचा जोर वाढला आहे. मागील चार ते पाच दिवसांपासून किमान तापमान १२ अंशांच्या आसपास आहे. दरम्यान पुढील चार ते पाच दिवसांत तापमान असेच राहण्याची तसेच यामध्ये आणखी एक अंशांनी घट होण्याची शक्यता आहे. त्यानंतर मात्र २१ नोव्हेंबरपासून किमान तापमानात २ ते ३ अंशाने वाढ होणार असून, गारठा कमी होणार असल्याचे हवामान तज्ज्ञांनी सांगितले आहे. दरम्यान नोव्हेंबर महिन्यात किमान तापमान सलग पाच दिवस १२ अंशांच्या आसपास आहे, ही मागील पाच वर्षातील पहिलीच वेळ आहे.

मागील सात ते आठ दिवसांपासून किमान तापमानात घट झाली आहे. त्यामागील मुख्य कारण म्हणजे उत्तरेकडून थंड वारे वाहत आहेत. तसेच महाराष्ट्रातील हवामान बदलामुळेही थंडावा वाढलेला आहे.

मागील पाच वर्षांपासून १२ ते १५ नोव्हेंबरच्या किमान तापमानाच्या नोंदी लक्षात घेता यंदा जवळपास ३ ते ४ अंशांनी तापमान घटले आहे. त्यामुळेच थंडीमध्ये वाढ झालेली आहे. सायंकाळी ५ वाजतापासून थंडावा



जाणवतो तसेच सकाळी १० वाजेपर्यंतही थंडीची चुणूक कायम राहते. दुपारच्या वेळीही उकाडा नाही. दरम्यान मागील सात ते आठ दिवसांपासून जाणवत असलेल्या थंडीमुळे अनेक बालक तसेच ज्येष्ठांमध्ये सर्दी, खोकल्यांचा त्रास जाणवत आहे. या काळात बालक, ज्येष्ठांसह अस्थमाच्या रुग्णांनी अधिक काळजी घेणे गरजेचे असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. सद्य:स्थितीत उत्तरेकडून थंड वारे वाहत आहे. त्यामुळे अमरावतीसह संपूर्ण राज्यात किमान तापमानात घट झाली आहे.

त्यामुळे सध्या थंडीचा जोर वाढलेला आहे. आणखी चार ते पाच दिवस असेच तापमान राहणार असून किमान तापमानात थोड्या प्रमाणात घट होऊ शकते. त्यामुळे थंडी वाढू शकते. मात्र २१ नोव्हेंबरपासून किमान तापमानात २ ते ३ अंशांची वाढ अपेक्षित आहे. -डॉ. प्रवीणकुमार, हवामान शास्त्रज्ञ, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर यांनी विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना सांगितले की मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यात याच दिवसांमध्ये किमान तापमान १७.५ ते १६ अंशांच्या आसपास होते. यंदा मात्र सध्याचे किमान तापमान मागील पाच ते सहा दिवसांपासून १२ अंशांच्या आसपास आहे. त्यामुळे यंदा जवळपास चार ते पाच अंशांनी किमान तापमानात घट झाल्याचे दिसून येत आहे.

# मतदार यादीचे अंतिम प्रकाशन पुढे ढकलले; जिल्हा परिषदेत गोंधळाची स्थिती

## नवी तारीख २४ नोव्हेंबर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**
जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठीच्या मतदार यादीच्या अंतिम प्रकाशनाला पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ही यादी आगामी २४ नोव्हेंबर रोजी जाहीर केली जाईल. यामुळे अमरावती जिल्ह्यातील ५९ जिल्हा परिषद आणि ११८ पंचायत समिती मतदारसंघांतील मतदारांची नेमकी संख्या त्याच दिवशी स्पष्ट होणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाचे उपसचिव के. सूर्यकृष्णमूर्ती यांच्या स्वाक्षरीने दोन दिवसांपूर्वी एक पत्र जारी करण्यात आले. या पत्रामुळे ११ नोव्हेंबर रोजी यादी घोषित करण्याच्या तयारीत असलेले जिल्हा प्रशासन अचानक थांबले असून, आता अधिकारी व कर्मचारी २४ नोव्हेंबरच्या तयारीला लागले असल्याची माहिती विदर्भ प्रजासत्ताक ला देण्यात आली

राज्य निवडणूक आयोगाच्या जुन्या




वेळापत्रकानुसार, जिल्हा परिषदेची प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी घोषित करण्यात आली होती. त्यानंतर १४ ऑक्टोबरपर्यंत या यादीवर हरकती व सूचना मागविण्यात आल्या. या हरकतींवर उपविभागीय अधिकाऱ्यांच्या (डऊज) स्तरावर सुनावणी घेण्यात आली. सुनावणीअंती सुधारणा केलेल्या अंतिम मतदार यादीची घोषणा २७ ऑक्टोबर रोजी अपेक्षित होती. मात्र, आयोगाने ऐनवेळी ३ नोव्हेंबर ही नवी तारीख दिली.अमरावती वगळता राज्यातील इतर काही जिल्ह्यांचे कामकाज पूर्ण न झाल्याने ३ नोव्हेंबरलाही यादीची घोषणा झाली नाही. त्यानंतर ११ नोव्हेंबर ही नवी तारीख देण्यात आली होती. आता पुन्हा ती तारीख २४ नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आल्याचे आयोगाने कळवले आहे. या वाढीव मुदतीचे पत्र सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आले आहे. नागरिकांकडून आता चौथ्यांदा मुदतवाढ देऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदार यादी जाहीर होण्याकडे जिल्हाभरातील नागरिकांचे आणि इच्छुक उमेदवारांचे लक्ष लागले आहे. प्रत्येक उमेदवाराला त्याच्या मतदारसंघातील मतदारांचा नेमका आकडा जाणून घ्यायचा आहे. प्रारूप मतदार यादीत सुमारे १५ लाख ३३ हजार मतदार आहेत. एकूण मतदारांच्या संख्येत कोणताही बदल होणार नाही, परंतु जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतदारसंघनिहाय मतदारांची संख्या जाणून घेण्यासाठी आता आणखी आठवडाभर प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या राखेची वीटभट्ट्यांना विक्री

## जांडू कन्स्ट्रक्शनचा प्रताप : शासनाला कोट्यवधी रुपयांचा फटका ट्रकमालकांनी उघडकीस आणला राखेचा काळाबाजार

मंगेश तायडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७नांदगाव पेठ**

नागपूर जिल्ह्यातील मौदा येथील शासकीय ऊर्जा प्रकल्पातून रहाटगाव येथील उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी विनामूल्य पुरविण्यात येणारी राख सर्रासपणे विक्री करत असल्याचा धक्कादायक प्रकार रविवारी उघडकीस आला. जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीच्या कर्मचाऱ्यांमार्फत स्थानिक वीटभट्टयांना तसेच व्यावसायिकांना सर्रासपणे पाच हजार प्रति ट्रकप्रमाणे ही राख विक्री केल्या जात होती. मात्र काही ट्रक मालकांच्या लक्षात हा प्रकार येताच त्यांनी रविवारी दुपारी ४ वाजता राखेच्या ठिय्यावर धडक दिली असता हा प्रकार उजेडात आला. जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीच्या वतीने काम सुरू असलेल्या रहाटगाव येथील उड्डाणपुलाच्या या प्रकल्पात गेल्या दोन महिन्यांपासून चार ते पाच हजार रुपये प्रति ट्रक या दराने राख



विक्रीचा काळाबाजार सुरू असल्याची माहिती स्थानिक चालकांनी दिली. रविवारी दुपारी चारच्या सुमारास भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे जिल्हा संयोजक राजू चिरडे तसेच नांदगाव पेठ ग्रामपंचायत सदस्य बलविर चव्हाण यांनी रहाटगाव येथील प्रकल्पावर अचानक धडक दिली असता , कामगारांना ट्रकमध्ये राख भरताना रंगेहात पकडले.अचानक ट्रकमालक व नागरिकांनी टाकलेल्या या धाडसत्रामुळे संबंधित कंत्राटदार आणि कर्मचारी घटनास्थळावरून पळून गेले.

त्याठिकाणी उभ्या असलेल्या चालकांनी राख विक्रीच्या संपूर्ण व्यवहाराची कबुली देत जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीचे कर्मचारी सुधांशु द्विवेदी,अग्रेश यादव यांच्या फोन पे वर जमा झालेल्या रकमेचे स्क्रीनशॉटही दाखवले. या व्यवहाराद्वारे दररोज लाखो रुपयांची उधळण होत असल्याची माहितीही समोर आली आहे.दररोज वीस ते पंचवीस ट्रक राख येथून विक्री होत असल्याची माहिती उपस्थित ट्रकचालकांनी दिली.सुरुवातीला एक हजार रुपये दराप्रमाणे व नंतर आता पाच हजार रुपये दराने येथून अवैधरीत्या राख विक्री होत असल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास आला. राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण च्या वतीने जांडू कन्स्ट्रक्शन कंपनी कडे उड्डाणपूल बांधण्याचा कंत्राट असून या बांधकामासाठी लागणारी राख ही मौदा येथील वीज प्रकल्पातून पुरविण्यात येते. मात्र येथील कंत्राटदार आणि कर्मचारी ही राख परस्पर वीटभट्टी मालक व व्यावसायिकांना विकत असून या गंभीर घोटाळ्यामुळे शासनाला तब्बल कोट्यवधी रुपयांचा फटका बसत आहे.घटनास्थळी पोलिसांना पाचारण करण्यात आले होते.पोलिसांनी घडलेल्या प्रकाराची माहिती घेतली मात्र रात्री उशिरापर्यंत कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आलेला नव्हता. या प्रकारामुळे उड्डाणपुलाच्याकामाची गुणवत्ता, सुरक्षितता आणि विश्वसनीयतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे.

**उडणाऱ्या राखेचा बंदोबस्त नाही**

जांडू कन्स्ट्रक्शन कंपनीने सुरुवातीला अवैधरित्या राख संकलित केली होती.माध्यमांनी हा प्रकार उचलून धरल्यानंतर व्यवस्थापनाने राख उडू नये यासाठी थातुरमातुर उपाययोजना केल्या होत्या मात्र अजूनही त्या उडणाऱ्या राखेचा बंदोबस्त करण्यात आलेला नाही. यामुळे प्रवास्यांनाअजूनही आपला जीव घोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे याकडे जिल्हा प्रशासनाने तात्काळ लक्ष द्यावे अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# गेल्या १० वर्षात गरीब व श्रीमंतीचे फार मोठे अंतर वाढले; हे शासनाचे सर्वात मोठे अपयश - किशोर बोरकर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

माझी जन्मभूमी हमालपुरा असुन मी आज जो काही आहे व त्यामध्ये हमालपुरा येथील ज्येष्ठांचा फार मोठा सहभाग आहे.हे आपले उपकार मी कधीही विसरू शकणार नसुन आम्ही आपल्याकडे मते मागायला आलो नाहीत.तर जनसंवाद बैठकीतुन आपल्या समस्या जाणून घेण्यासाठी आलो आहोत व मी सुध्दा मनपाची कोणत्याही प्रभागातून निवडणूक लढविणार नसल्याचे नम्रपणे आपणास सांगत आहोत,असे जनसंवाद बैठकीच्या सुरवातीलाच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस,किशोर बोरकर यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले असुन ते पुढे म्हणाले कि,प्रत्येक राज्य शासनाचा एक विकास दर असतो, वर्षं २०२४-२५ मध्ये महाराष्ट्राचा विकास दर ७.३% होता. हा विकास दर चांगला असला तर सत्ताधीश या विकास दराची वस्त्रे घालुन फिरतात,व आपले खोटे सौंदर्य जनतेला सांगत फिरतात.सामान्य व गरीब जनतेला या विकास दराचा काहीच संबध नसतो, त्यांना हि भाषाही समजत नाही.देशातील आज तिसऱ्या व चौथ्या पीढी मधील कुटुंबे आजही मोलमजुरी करून आपल्या परीवाराचे पालनपोषण करतात,हे भिषण वास्तव आज देशात आहे.या विकास दरांच्या बातांमध्ये या वर्गाला काहीच देणंघेणं नाही.गेल्या १० वर्षात गरीब व श्रीमंतीचे फार मोठे अंतर वाढले असल्यामुळे हे शासनाचे सर्वात मोठे अपयश असल्याचा आरोप, स्थानिक हमालपुरा,येथील सम्राट अशोक मंडळाद्वारा जनसंवाद बैठकीत, प्रभाग क्रमांक ११ रूक्मिणी नगर फ्रेजरपुरा व बेनोडा १० या प्रभागाचे निरीक्षक तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी केला आहे. किशोर बोरकर पुढे म्हणाले की, आता राज्याचा जीडीपी वाढला असून यामुळे जनतेची समृध्दी होणार असल्याचे सत्ताधीश जरी सांगत असले तरी ते साक्षात थोंटाग असुन प्रत्यक्षात गरीब जनतेची कोणतीही सम्रुध्दी होणार नसुन सम्रुध्दी महामार्गला लागुन ज्या नौकरदार,बिल्डर व बडे व्यापाऱ्यांनी जमीनी घेतल्या आहेत,त्यांचीच सम्रुध्दी होणार असल्याची खोचक टिका याप्रसंगी किशोर बोरकर यांनी केली आहे. सम्राट अशोक मंडळ हमालपुरा द्वारा आयोजित जनसंवाद बैठकीत, स्थानिक महीला व नागरीकांनी आपल्या भागातील जनसमस्या निर्भयपणे सांगाव्यात,असे किशोर बोरकर यांनी उपस्थितांना विनंती केली असता,मान्यवरांसमोर उपस्थित महीला व नागरीकांनी आपल्या भागातील जनसमस्या सांगितल्या.याप्रसंगी अमरावती शहर तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख,सलीम मिरावाले,पंकज मेश्राम व सौ.शिल्पा राऊत यांनी स्थानिक नागरिकांच्या समस्येवर आपले मनोगत व्यक्त केले.जनसंवाद बैठकीला,प्रा.अनिल देशमुख, समीर जवजांळ,सतिश शेंडे,राहुल चवरे,सागर लांजेवार,विवेक वासनिक,अनिता हुमाने,श्रीमती भारती मेश्राम,श्रीमती येणूताई पानेकर यमुनाबाई उके,अनिता तांगडे,सुजाता मेश्राम,श्रुष्टी उके,विशाखा बागडे,लोकेश वाहणे,अर्थव शेंडे,विवेक कुंभलवार,निखील फुलके,प्रतिक तिरपुडे सुशिला लांजेवार, वंदना लांजेवार, शारदाताई रामटेके, गिता सहारे, मुन्ना लोणारे आदि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.जनसंवाद बैठकीचे संचालन व समारोप विज्ञान वानखेडे यांनी केले.


# अंजनगांव सुर्जी शहराच्या राजकारणात खेळी खेळणारे जुने धुरंदर नेते अजूनही माहीर

## भावी नगरसेवकांना राजकीय गुरुंचे आशिर्वाद घेतल्याशिवाय पर्याय नाही

सचिन पाटील अब्रुक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी नगरपालिका निवडणूकीची रणधुमाळी सुरू झाली असून उमेदवारी अर्ज भरण्याची तारीख शेवटच्या टप्प्यात आहे. अजुनही कोणत्याही प्रमुख पक्षाने अधिकृत उमेदवारांची घोषणा न केल्याने शहरात राजकीय तापमान चांगलेच वाढले आहे. इच्छुक उमेदवारांची लगबग, गुप्त बैठका आणि चर्चांचा भडका यामुळे अंजनगाव शहरांचे राजकारण अक्षरशः धगधगत आहे.अंजनगाव आणि सुर्जी ही दोन जुडी शहरे असून या दोन्ही जुड्या शहरांतील राजकीय घराण्यातील खेळी खेळणारे माहीर अजुनही कार्यरत आहेत. काळानंतर काळ बदलला राजकारण बदलले मात्र राजकारणी माहीर अजुनही कायम आहेत.शहरात जुने राजकीय माहीर घराणे अजुनही सर्वच जाती धर्मात आहेत त्यातील काही घराण्यांनी कुटुंबात कोणी सक्रिय



नसल्याने राजकीय छंद बंद केला तर काही घराण्यातील कुटूंबातील शासकीय नोकरी तर काही व्यवसायात गुंतल्या मुळे राजकीय पाऊल मागे घेतले. काही घराण्यांमध्ये अजुनही राजकीय धुरंधर जाणकार आहेत. शहरातील अनेक जुने राजकीय घराण्याना मानणारा वर्ग सुद्धा शहरात मोठ्या प्रमाणात आहेत. या राजकीय धुरंधर नेत्यांची अंजनगाव शहरातुन ते शहरातील सुर्जी भागा पर्यंत संख्या नवू ते दहा घराची आहे. धुरंदर नेत्यांची संख्या कमी जरी असली तरी ते राजकारणात घरी बसून राजकीय रणनिती आखण्यात माहिर आहेत. नगरपालिका सत्ता परिवर्तन घडवून आणण्याची त्यांच्यात क्षमता आहे. त्यामुळे कोणत्याही पक्षाचा उमेदवार या जाणकारांचे आशिर्वाद घेतल्याशिवाय राहत नाही ज्या उमेदवारांना आशिर्वाद दिल्यास त्यांच्या साठी हे धुरंदर नेते घरुनच राजकीय गोट्या दाबुन राजकीय रणनिती आखून उमेदवारांचा विजयासाठी प्रयत्न करतात आणि उमेदवाराला निवडून आणण्याची भूमिका बजावतात. काही धुरंदर नेते मंडळींच्या घराण्यात निवडणूक मध्ये उभे राहत नाही आणि राजकीय बोलण्यात रस नसल्याचे जाणवते त्यामुळे नवीन हवशी उमेदवार त्या घराण्यावर लक्ष देत नाही मात्र हे धुरंदर नेते आकड्यांचा खेळ खेळून त्या हवशी उमेदवारांचा पराभव करून घरी बसून राहिल्या शिवाय स्तब्ध बसत नाही. काही राजकीय घराण्यातील व्यक्तींचा सक्रिय सहभाग नाही तर काही घराण्यात अजूनही कुटुंबातील एक व्यक्ती राजकारणात सक्रिय आहेत. त्यामुळे राजकीय धुरंधर नेते मंडळीचा सल्ला मार्गदर्शन घेऊन उमेदवारांना प्रचाराची सुरुवात करावी लागते त्यामुळे या घराण्याना निवडणूक उत्सव दरम्यान खूप महत्त्व प्राप्त आहे.

# शेगाव गावठाणातील मोबाईल टॉवर बांधणीला विरोध

## परवानगी रद्द करण्याची भारतीय दलित पँथरची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

शेगाव गावठाण परिसरात चालू असलेल्या मोबाईल टॉवरच्या बांधकामास स्थानिक नागरिकांच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर परवानगी रद्द करण्याची मागणी भारतीय दलित पँथर संघटनेने केली आहे. जिल्हाध्यक्ष प्रविण पाटील यांच्या नेतृत्वाखाली संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की श्री. संतोष बापुराव कुंभारे यांच्या मालकीच्या जागेवर टॉवरचे बांधकाम सुरू असून त्या जागेची योग्य तपासणी न होता काम सुरू झाल्याचा आरोप आहे. टॉवरच्या १०० मीटर परिसरात समाज मंदिर, बौद्ध मंदिर, हनुमान मंदिर तसेच अंगणवाडी व प्राथमिक शाळा असल्याने धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांदरम्यान होणारी गर्दी तसेच लहान मुलांवर टॉवरमधील किरणोत्सर्गाचा संभाव्य परिणाम याबाबत नागरिकांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे.याशिवाय गावातील अरुंद रस्त्यांमुळे विवाह व सार्वजनिक कार्यक्रमांतील ञा च्या कंपामुळे टॉवरची स्थिरता धोक्यात येऊ शकते, अशीही शक्यता निवेदनात नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे या टॉवरला मंजूर करण्यात आलेली परवानगी तात्काळ रद्द करावी, अन्यथा आंदोलनाची भूमिका घेण्याचा इशारा दलित पँथरने दिला आहे.

# टीईटी संदर्भातआरटीई कलम २३(२) मध्ये सुधारणा करा

## शिक्षक समितीचे खासदार बळवंत वानखडे यांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

टीईटी संबंधी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे देशभरातील लाखो प्राथमिक शिक्षकांवर होणाऱ्या परिणामाच्या पार्श्वभूमीवर RTE Act कलम २३(२) मध्ये तातडीने सुधारणा करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे. या संदर्भातील निवेदन अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार मा. बळवंत वानखडे यांना देण्यात आले. देशातील सर्व खासदारांनी लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करावा, अशी समितीची सर्व पातळ्यांवरील विनंती आहे.

समितीचे म्हणणे आहे की NCTE ने TET परीक्षा अनिवार्य करण्यापूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांनी सर्व शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पूर्ण केल्या असून सेवेत भरतीसाठी आवश्यक असलेली प्रवेश परीक्षा सुद्धा उत्तीर्ण केली आहे. त्यामुळे आता सेवेत टिकण्यासाठी किंवा पदोन्नतीसाठी ढएढ अनिवार्य करणे अन्यायकारक ठरते. या संदर्भातील सविस्तर निवेदन केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनाही पाठविण्यात आले आहे.खासदार वानखडे यांनी आगामी अधिवेशनात हा विषय प्रभावीपणे मांडावा, अशी आग्रही मागणी समितीने केली. निवेदन देताना राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर, जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार, सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे, राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर आदी उपस्थित होते.

# भातकुली पंचायत समितीतील शिक्षकांना 'मूल्यवर्धन'चे मार्गदर्शन; दोन टप्प्यात प्रशिक्षणाला उत्साह



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७भातकुली**

पंचायत समिती भातकुलीतील इयत्ता १ ते ८ मधील सर्व शिक्षकांना 'मूल्यवर्धन' कार्यक्रमांतर्गत दोन टप्प्यात तालुकास्तरीय प्रशिक्षण दिले जात आहे. महाराष्ट्र शासन आणि शांतिलाल मुथ्था फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षणाची भक्कम पायाभरणी करणे हा आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० व राज्य अभ्यासक्रम आराखड्यातील मूल्यशिक्षणाच्या अपेक्षांच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या सुधारित 'मूल्यवर्धन' कार्यक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येणार आहे.

गटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे यांच्या मार्गदर्शनाखाली, तालुका समन्वयक चंद्रकांत कडबे आणि फाऊंडेशनच्या समन्वयक ज्योती औघड यांच्या उपस्थितीत हे प्रशिक्षण सुरू आहे. प्रितेश मेहरे, राजकुमार गंगराळे, मिनाक्षी खरटमोल, ज्ञानेश्वर सिरसाठ, सुधीर कवाने, पंकज दहिकर, सतिश देशमुख, प्रकाश देशमुख, सतिश वानखेडे, शैलेश माकोडे व प्रभारी केंद्रप्रमुख शैलेन्द्र दहातोंडे प्रशिक्षण देत आहेत. पहिला टप्पा ११ ते १३ नोव्हेंबर तर दुसरा टप्पा १७ ते १९ नोव्हेंबरला होत आहे.बालस्नेही, सहयोगी आणि मूल्याधारित उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा कार्यक्रमाचा उद्देश असून मराठी, हिंदी आणि इंग्रजी माध्यमांमध्ये त्याची अंमलबजावणी होणार आहे, अशी माहिती प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली.

# शहीद करतार सिंह सराभा यांना अभिवादन; राष्ट्रीय पत्रकार दिनानिमित्त तिवसात पत्रकारांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७तिवसा**

श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचालित श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात शहीद करतार सिंह सराभा यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे श्री अनिल थुल, ज्येष्ठ पत्रकार जानराव मनोहर, हेमंत निखाडे, सुनील घोरमाडे व प्रशिक शापामोहन यांच्या हस्ते शहीद सराभा यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. अवघ्या १९व्या वर्षी गदर चळवळीत योगदान देत देशासाठी बलिदान देणाऱ्या करतार सिंह यांचे स्मरण उपस्थितांनी कृतज्ञतेने केले.



कार्यक्रमात राष्ट्रीय पत्रकार दिनाचे औचित्य साधत वाचनालयातर्फे तिवसा तालुक्यात कार्यरत पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार जानराव मनोहर, हेमंत निखाडे, दैनिक विदर्भ प्रजासत्ताकचे सुनील घोरमाडे आणि विदर्भ मतदारचे प्रशिक शापामोहन यांना शाल-श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

यानंतर मनोहर व निखाडे यांनी पत्रकारितेतील अनुभव आणि भूमिकेबाबत विचार व्यक्त केले. कार्यक्रमाला ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, अंकुश देशमुख, राजाभाऊ देशमुख, सुरज तंवर, सचिन काळे, सौरभ इंगळे आदी मान्यवर व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन आकाश गोरले यांनी केले.

# मोरबाग-रहाटगाव प्रभागातील शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

## प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष या मूल्यांवर काम करा - डॉ. नितीन धांडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी व भारतीय जनता युवा मोर्चाच्या उपस्थितीत मोरबाग-मसानगंज व रहाटगाव भागातील शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विकासाभिमुख धोरणांवर विश्वास ठेवून हा मोठा प्रवेश झाला.



भाजपा अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे, खासदार अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, प्रदेश प्रवक्ते किरण पातुरकर, युवा मोर्चा अध्यक्ष विक्की शर्मा यांसह वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. काँग्रेस प्रदेश सचिव आणि माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांचे निकटवर्तीय आकाश तायडे, कल्याणी तायडे तसेच दीपक साहू व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठ्या संख्येने प्रवेश केला.नवागतांचे स्वागत करताना डॉ. धांडे यांनी प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः या तत्वांवर कार्य करण्याचे आवाहन केले. भाजपा हा ध्येय-धोरणावर चालणारा, नियमबद्ध आणि सर्वसमावेशक पक्ष असून समाजातील शेवटच्या घटकाला न्याय देण्याची भूमिका पक्ष नेहमीच निभावतो, असे त्यांनी सांगितले.मोरबाग व रहाटगाव परिसरातील अनेक युवक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे पक्ष संघटनेला मोठी ताकद मिळाल्याचे शहर जिल्हाध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांनी सांगितले.

# नगरपरिषद निवडणुकीत 'ओल्या पाटर्यांची' लाट

## कार्यकर्ते,पदाधिकाऱ्यांना आलेत अच्छे दिन



अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराला वेग आल्याने शहरात 'ओल्या पाटर्यांचे ' नियोजन रविवारी मोठ्या प्रमाणावर करण्यात आले असल्याचे चित्र जिल्ह्यात पहावयास मिळाले. नामांकन दाखल करण्यासाठी अवघे दोनच दिवस उरले असताना अनेक इच्छुक उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी मतदारांना आकर्षित करण्यासाठी ओल्या पाटर्यांची मोहीम सुरू केल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. निवडणूक अटीतटीची होणार असल्याचे संकेत मिळत असून, मतदारांना प्रलोभने देण्याच्या या पद्धतीवर सूज्ञ नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

आचारसंहिता लागू असूनही निवडणूक आयोगाचे कडक नियम आणि त्यांची अंमलबजावणी करणारे अधिकारी प्रत्यक्षात कुठेच दिसत नसल्याची चर्चा मतदारांत सुरू आहे. पोलिस प्रशासनालाही स्पष्ट आदेश असूनही, ओल्या पाटर्यांवर नियंत्रण कोणाच्या अखत्यारीत आहे, याबाबत संभ्रम कायम आहे.

निवडणूक आयोग पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त निवडणुकीचे दावे करतो; फिरती पथके, प्रशिक्षण, कागदी कामे यासह संपूर्ण यंत्रणा उभी असते. मात्र प्रत्यक्ष नियंत्रण आणि कारवाई मात्र फक्त कागदावरच असल्याची टीका स्थानिक नागरिकांनी केली. फिरत्या पथकाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

शहरात निर्भयपणे सुरू असलेल्या 'ओल्या पाटर्यांवर 'वर कारवाई होणार का, निवडणूक विभाग आणि पोलिस याकडे खरंच लक्ष देणार का, हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होणार आहे. दरम्यान, २ डिसेंबरपर्यंत पाटर्या आणखी वेगाने सुरू राहण्याची शक्यता स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस यांचे मामेभाऊ निवडणुकीच्या रिंगणात

## नवनीत राणा म्हणाल्या चिखलदऱ्याच्या विकासासाठी हेच योग्य उमेदवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ आल्हाद कलोती यांनी चिखलदरा नगरपालिकेच्या निवडणुकीत नगरसेवकपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. चिखलदऱ्याचा सर्वांगीण विकास हाच आपला मुख्य अजेंडा आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. आठवडाभरापुर्वी देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती दौऱ्याच्या वेळी आल्हाद कलोती यांच्या निवासस्थानी भेट दिली होती. कलोती परिवाराची सामाजिक कार्याची भक्कम पार्श्वभूमी आणि देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ अशी दुहेरी ओळख असलेल्या आल्हाद कलोती यांच्या सक्रीय राजकारणातील प्रवेशामुळे चिखलदरा येथील



निवडणूक रंगतदार बनली आहे.

आमदार रवी राणा यांनी आल्हाद कलोती यांच्या उमेदवारीला पूर्ण पाठिंबा देताना चिखलदऱ्याच्या विकासाचा थेट संबंध मुख्यमंत्र्यांच्या आवडीशी जोडला. रवी राणा म्हणाले, चिखलदरा हे देवेंद्र फडणवीस यांचे आवडते आणि आपुलकीचे 'हिल स्टेशन' आहे. आल्हाद कलोती निवडून आल्यास येथील विकासाचे चित्र पूर्णपणे बदलणार आहे. कलोती परिवाराने अंध विद्यालय, शैक्षणिक क्षेत्र, तसेच गवळी, आदिवासी, ओबीसी व कलार समाजासाठी केलेल्या भरीव कार्याचा वारसा आल्हाद कलोती पुढे नेत आहेत. 'स्काय वॉक', पर्यटन विकास, रस्ते सुविधा, पिण्याच्या पाण्याचे प्रकल्प आणि विद्युत प्रकल्पांसारखे मोठे प्रकल्प कलोती यांच्यामुळेच मार्गी लागतील. त्यामुळे चिखलदऱ्याच्या सर्वांगीण विकासासाठी तेच योग्य उमेदवार आहेत, त्यांच्या विजयासाठी युवा स्वाभिमान पार्टी पूर्ण ताकदीने काम करेल, असे रवी राणा यांनी स्पष्ट केले.

माजी खासदार नवनीत राणा यांनीही आल्हाद कलोती हेच चिखलदऱ्यासाठी योग्य उमेदवार असल्याचे सांगितले. चिखलदऱ्याच्या विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मोठा निधी उपलब्ध करून देण्याचा संकल्प नवनीत राणा यांनी यावेळी व्यक्त केला.

आल्हाद कलोती यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला, त्यावेळी भाजपचे अमरावती जिल्हा निवडणूक प्रभारी आमदार संजय कुटे, राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार केवलराम काळे, प्रभुदास भिलावेकर, प्रविण पोटे, राजेंद्र सोमवंशी, राजेश मांगलेकर, अन्वर हुसेन यांच्यासह भाजप व युवा स्वाभिमान पार्टीचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा 8605948853

# उमेदवारी मिळाली तर ठीक अन्यथा अपक्षाचा पर्याय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ चिखलदरा**



निवडणुकीचा बिगुल वाजताच शहरात राजकीय वातावरण तापायला सुरुवात झाली आहे. थेट जनतेतून नगराध्यक्ष निवडला जाणार असल्याने नगराध्यक्ष पदासाठी इच्छुकांनी तयारी सुरू केली आहे. २ डिसेंबरला मतदान होणार असल्याने इच्छुकांसह कार्यकर्त्यांची धावपळ सुरू झाली आहे.

मागील साडेतीन वर्षापासून नगर परिषदेची निवडणूक न झाल्याने यंदाची निवडणूक राजकीयदृष्ट्या निर्णायक ठरणार आहे. बंडखोरी टाळण्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांनी अजूनही उमेदवारांची यादी अंतिम केली नसल्याची चर्चा रंगली आहे. तर दुसरीकडे काहींनी पक्षांतराचा पर्यायही खुला ठेवला, तर काहींनी अपक्ष म्हणून निवडणुकीला सामोरे जाण्याची तयार चालविली आहे. इच्छुकांची संख्या वाढल्याने प्रत्येक पक्षात असंतोष व बंडखोरी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. निवडणूक जाहीर होताच इच्छुकांनी वरिष्ठ नेत्यांच्या संपर्कात येणाऱ्यांची संख्या वाढत आहे. दुसरीकडे नगर परिषदेची सत्ता आपल्या हाती राहावी, यासाठी पक्षांनी राजकीय गणिते आणि आंतरिक रणनीती आखणे सुरू केले आहे. आजी-माजी पदाधिकारी पुन्हा तिकीट मिळवण्यासाठी प्रयत्नशील असून, काहींनी तर पक्षांतराचा पर्यायही खुला ठेवला आहे. तिकीट न मिळाल्यास अपक्ष म्हणून रिंगणात उतरण्याची तयारी अनेकांनी केली आहे. त्यामुळे आगामी काही दिवसांत पक्षांतर्गत असंतोष उफाळून येण्याची शक्यता आहे. नामनिर्देशनपत्र भरण्याच्या चौथ्या दिवशीही मोजक्याच उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. मात्र, अद्यापही प्रमुख पक्षांनी उमेदवारांची घोषणा गुलदस्त्यात ठेवल्याने उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

**भेटीगाठी-जनसंपर्कावर दिला जातोय भर**

प्रत्येक प्रभागात इच्छुक भेटीगाठी मोहिमा राबवू लागले आहेत. विशेषतः युवा उमेदवारांचा उत्साह उल्लेखनीय आहे. ते सोशल मीडियापासून ते गल्लीबोळात आपली उपस्थिती दाखवत आहेत. विद्यमान नगरसेवक पुन्हा उमेदवारी मिळवण्यासाठी पक्षश्रेष्ठींची मर्जी राखण्याच्या प्रयत्नात आहेत, तर नवोदित उमेदवार नव्या संघटनात्मक रणनीतीची आखणी करत आहेत.

# लंडनहून परतलेल्या थोरात दाम्पत्याचे तळेगाव ठाकूरमध्ये जल्लोषात स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७तिवसा**

तळेगाव ठाकूर गावात रविवारी आनंद, उत्साह आणि आपुलकीचे अनोखे वातावरण पाहायला मिळाले. तब्बल तीन वर्षांनी लंडनहून मायभूमीत परतलेल्या पंकज आणि निशा थोरात दाम्पत्याचे गावात पाऊल ठेवताच ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत करून त्यांच्या पुनरागमनाचा सोहळा संस्मरणीय बनवला. पंकज थोरात हे लंडनमध्ये इलेक्ट्रिकल अँड इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनीअर म्हणून कार्यरत असून त्यांची पत्नी निशा थोरात सॉफ्टवेअर इंजिनीअर आहे.

दाम्पत्याच्या आगमनानंतर ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि स्वागतगर्जनांनी संपूर्ण गाव दुमदुमून गेले. गावी आल्यानंतर त्यांनी प्रथम तळेगाव ठाकूर येथील बौद्ध विहारात दर्शन घेऊन मातीतल्या श्रद्धास्थानांना वंदन केले. त्यानंतर त्यांच्या घरी पारंपरिक पद्धतीने गृहप्रवेश विधी पार पडला. पंकज यांच्या बहिणी माधुरी थोरात यांनी ओवाळणी करून दाम्पत्याचे औक्षण केले. दीर्घकाळानंतर कुटुंबीयांची भेट होताच पंकज आणि निशा यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले.

या स्वागत सोहळयास कुटुंबातील रंगराव गायकवाड, महादेव थोरात, अरुण थोरात, विलास थोरात यांच्यासह अनेक मान्यवर ग्रामस्थांची उपस्थिती होती.पंकज थोरात म्हणाले, परदेशातील शिक्षणासाठी माझ्या पत्नीचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. लंडनचे शिक्षण आणि वातावरण उत्तम असले तरी तळेगावात मिळणारे प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळ्याला तोड नाही. मोठे भाऊ चंदू भाऊ थोरात आणि संपूर्ण कुटुंबाने दिलेले प्रोत्साहन माझ्यासाठी अमूल्य आहे.थोरात दाम्पत्याच्या पुनरागमनाने तळेगाव ठाकूर गावात सणासारखा उत्साह पसरला आहे.

# थंडीचा जोर वाढताच सुकामेव्याच्या लाडूंना मागणी; आरोग्यासाठी लाभदायी सेवनाचा सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

थंडीचा कडाका वाढताच सुकामेवा आणि सुकामेव्याचे लाडू खाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, शरीराला उष्णता देण्यासाठी हे पदार्थ अत्यंत फायदेशीर असल्याचा सल्ला आयुर्वेदाचार्य डॉ. राजीव धानोरकर यांनी दिला आहे. सुकामेवा शरीराला आवश्यक ऊर्जा, उष्णता आणि पौषक द्रव्ये देत असल्याने हिवाळ्यात या पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी उपयुक्त ठरते. त्वचा निरोगी ठेवण्यासही सुकामेवा प्रभावी ठरतो.



हिवाळ्यातील 'पोषणकाळ' सुरू झाल्याने घराघरांत पौष्टिक लाडू तयार करण्याची लगबग सुरू आहे. नोकरी किंवा कामामुळे वेळ न मिळणाऱ्या महिलादेखील आरोग्याची काळजी घेत रेडिमेड सुकामेवा लाडूंची खरेदी करताना दिसत आहेत. थंडी वाढल्याने भूकही वाढते आणि त्यामुळे शरीराला आवश्यक पोषण मिळण्यासाठी सुकामेवा उत्तम मानला जातो.

दरम्यान बाजारात सुकामेव्यांच्या किंमतींमध्ये थोडाफार चढ-उतार दिसत आहे. काजू १००० ते १२०० रुपये, बदाम ८०० ते ९०० रुपये, किसमिस २६० ते ३५० रुपये, खारीक २३० रुपये, डिंक २७० रुपये, पिस्ता ११०० ते १३०० रुपये, गुळ ५० ते ६० रुपये तर खाबरे २४० ते ३०० रुपये असा दरवाढीचा कल दिसतोय.

थंडीमध्ये शरीराला उष्णता देणाऱ्या पदार्थांचे सेवन आवश्यक असल्याने पौष्टिक सुकामेवा लाडू आरोग्य व त्वचेसाठीही लाभदायी ठरतात, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

**रेडिमेड लाडू खरेदीला देताहेत पसंती**

थंडीच्या दिवसात शरीरात ऊर्जा यावी, प्रकृती तंदुरुस्त, निरोगी राहावी, यासाठी काजू, बदाम, खारीक, खोबरे, मेथ्या आदी सुकामेव्यापासून डिंकाचे पौष्टिक लाडू खाण्यास पसंती दिली जात आहे. मागील आठवड्यात जिल्ह्यात थंडीने कहर केला होता. त्यामुळे मुकामेवा, डिंक खरेदीसाठी बाजारपेठेत ग्राहकांची गर्दी वाढल्याचे चित्र आहे. काजू, बदाम, पिस्ता, खारीक खोबरे, गूळ आणि डिंक यापासून तयार केलेले लाडू पौष्टिक तसेच चवीला स्वादिष्ट असल्याने मुलांपासून घरातील सर्वांनाच त्यांची पसंती असते. अनेकजण रेडिमेड खरेदीला प्राधान्य देत असतात.

# रणधुमाळी : भिंती अबोल अन् प्रचाराचे हायटेक बोल

## मोबाइलवर प्रचाराचा धुराळा: निवडणुकीत व्हॉट्सअ‍ॅप, फेसबूक, इस्टाग्रामचा वाढला वापर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

पूर्वी कोणतीही निवडणूक म्हटली की, हँडबिल,मोठमोठी कागदी पोस्टर्स, भोंगे, रंगवलेल्या भिंती, बिल्ले, असे प्रचाराचे माध्यम होते. त्या वेळेस जो तो राजकीय पक्ष विविध रंगांनी आपल्या प्रचारासाठी शहरातील भिंती रंगवायचा. विशेष रंग मिळो की, न मिळो, चुना आणि गेरूने शहरातील भिंती अगदी उठून दिसायच्या. आजमितीस ती परिस्थिती राहिलेली नाही. आता ना भिंती रंगवायची गरज आहे, ना कुठे फारसे भोंगे लावायची गरज पडत आहे. आता थेट इंटरनेटद्वारे व्हॉट्सअ‍ॅप, इन्स्टाग्राम, फेसबूक, अशी माध्यमे आली असून, थेट




मतदारांच्या मोबाइलवर प्रचाराचा धुराळा पाहायला मिळत आहे.

वेबसाइटवर सत्ताधारी सरकारच्या काळात झालेल्या विकासकामांवर प्रकाश टाकणारे अनेक छोटे व्हिडीओही दाखविण्यात येत आहेत. व्हॉट्सअ‍ॅपसह सोशल मीडियामुळे राजकीय पक्ष व पुढाऱ्यांना कोणत्याही निर्बंधांशिवाय जनतेशी थेट संपर्क, तसेच मतदारांकडूनसुद्धा राबविलेल्या योजनांबद्दल अभिप्राय मागवला जात आहे, तर विरोधक आम्ही गरिबांना अनुदान मिळवून देणार, शहराचा विकास करणार, प्रत्येक वॉर्डात विकासकामे करणार, अशा उपक्रमाबद्दल मतदारांना आकर्षित करताना दिसत आहेत.

**प्रचाराचे हायटेक फंडे**

कोणत्याही निर्बंधांशिवाय राजकीय पक्षांना जनतेशी मोबाइलमुळे त्वरित संपर्क साधण्यासाठी मदत होते. इन्स्टाग्राम किंवा एक्स मीडियासारखे इतर अनेक प्लॅटफार्म विशिष्ट वापरकर्त्यांपर्यंत पोहोचत असल्याने त्याचे स्वरूपही वेगळे असते. मीडियासारखे मॅसेज पोहोचवणारे प्लॅटफार्म मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी आहे.

# मतदान कार्ड नाही, टेन्शन नाही! ही ओळखपत्रे दाखवा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७अमरावती**

नगर परिषद निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. मतदानासाठी निवडणूक आयोगाचे मतदार ओळखपत्र नसले, तरी टेन्शन घेण्याचे कारण नाही. मतदारांना १२ पर्यायी ओळखपत्रांपैकी कोणतेही एक दाखवून मतदान करु शकतील.

मतदार यादीत आपले नाव असल्यास, वोटर आयडी हरवला किंवा मिळाला नसेल तरीही मतदान करता येईल. फक्त ओळख सिद्ध करणारा दुसरा पुरावा सोबत असणे आवश्यक आहे.मतदार ओळखपत्र हरवले असल्यास किंवा मिळाले नसेल, तर राष्ट्रीय मतदार सेवा या संकेतस्थळावरून घरी बसून नवीन कार्डसाठी अर्ज करता येईल.'डीजी लॉकर' हे शासनमान्य अ‍ॅप असल्याने त्यातील डिजिटल ओळखपत्रे (उदा. आधार, पॅन, ड्रायव्हिंग लायसन्स) हीसुद्धा वैध मानली जातील.




**ही १२ ओळखपत्रे चालणार वैध पुरावा म्हणून**

आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, विमा स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, पासपोर्ट, पेन्शन कार्ड, मनरेगाचे जॉब कार्ड, शासकीय कर्मचारी ओळखपत्र, शासकीय योजना लाभार्थी कार्ड, तसेच ईपीआयसी क्रमांकासह अन्य अधिकृत ओळखपत्र यापैकी कोणतेही एक दाखवता येईल.त्यामुळे मतदानाला जाताना मतदारांना कुठलीही अडचण येणार नाही. याबाबत निवडणूक विभागाकडून जनजागृतीही करण्यात येत आहे.



आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
विदर्भ प्रजासत्ताक
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत